cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२१ | गुरूवार दि.०९ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘एक देश, एक निवडणूक’ : अजेंडा की लोकशाहीचे नवे वळण ?

भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिनानिमित्त नरेंद्र मोदी यांनी केलेल्या भाषणातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले की ‘एक देश, एक निवडणूक’ आणि ‘समान नागरी कायदा’ हे विषय केवळ चर्चेपुरते मर्यादित नसून सत्ताधारी पक्षाच्या दीर्घकालीन राजकीय आणि धोरणात्मक अजेंड्याचे केंद्रबिंदू आहेत. देशात या दोन मुद्यांवर ‘‘सकारात्मक वातावरण’’ तयार होत असल्याचा दावा करताना मोदी यांनी भाजपच्या ‘‘अधुर्या कार्यां’’ची पूर्तता करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाखांची मदत

## जानेवारीपासून झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू

मुंबई I प्रतिनिधी

**राज्यात ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते. जानेवारी ते मार्च २०२६



दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यु आणि नऊ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे. एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या पावसानेही १,९४,३२९ शेतकऱ्यांच्या १,२२,९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजानुसार ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मराठवाड्यात २.५९ कोटी क्विंटल साखरेचे उत्पादन

संभाजीनगरः मराठवाड्यातील एकूण ६६ साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम जवळपास आटोपल्यात जमा आहे. या कारखान्यांनी १ एप्रिल अखेरपर्यंत सुमारे २ कोटी ९७ लाख ७५ हजार ७२ टन ऊस गाळपातून सुमारे २ कोटी ५९ लाख ३५ हजार ७८२ क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. यंदाच्या ऊस गाळप हंगामात मराठवाड्यातील तब्बल ६६ कारखान्यांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये २९ सहकारी, तर २७ खासगी साखर कारखान्यांचा समावेश होता. प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाच्या अहवालानुसार, एक एप्रिलअखेर यंदाच्या ऊस गाळपात सहभागी कारखान्यांपैकी छत्रपती संभाजीनगर जालना व बीडमधील दोन–तीन कारखान्यांचे सुरू असलेले तुरळक गाळप वगळता सर्वच कारखान्यांचे गाळप आटोपले होते.

### नरेंद्र मोदींचा ना खाऊंगा, ना खाने दुंगाचा नारा पोकळ

मुंबईः नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली मोठी आश्वासने देऊन सत्ता मिळवली. वर्षाला २ कोटी रोजगार देणार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, १०० स्मार्ट सीटी बनवणार, विकास करणार अशा घोषणा दिल्या. ना खाऊंगा ना खाने दुंगा, अशी राणाभीमदेवी थाटात गर्जना केली पण मोदी फुसका बार निघाले. १२ वर्षापासून देशात अक्षरशः लुट सुरु आहे, दोन गुजराती देश विकत आहेत तर दोन गुजराती खरेदी करत आहेत. देशात जे सुरु आहे तेच महाराष्ट्रातही सुरु आहे, ‘बडे मियां तो बडे मियां, छोटे मियां भी सुभानल्ला’, अशी परिस्थिती आहे, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली सुरु असलेल्या न्याय सत्याग्रह आंदोलनाला उपस्थिती लावून काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी युवक काँग्रेसच्या कामाचे कौतुक केले, या संघर्षात युवक काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपा सरकारवर तोफ डागली.

### इराण युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्था संकटात

मुंबईः पश्चिम आशियातील युद्ध आणि जागतिक भू–राजकीय तणावाचा थेट परिणाम आता भारतीय सर्वसामान्यांच्या खिशावर होताना दिसत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी त्यांच्या ताज्या मॉनेटरी पॉलिसी बैठकीत भारतीय अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा वाजवली आहे. मिडल ईस्ट संकटामुळे आगामी काळात महागाईचा भडका उडण्याची शक्यता असून जीडीपी वाढीचा वेगही मंदावणार असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात रिझर्व्ह बँकेने सावध पवित्रा घेत रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवला आहे. वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळवणे आणि आर्थिक विकासाला गती देणे यामध्ये संतुलन राखण्यासाठी आरबीआयने हा निर्णय घेतला आहे. यामुळे सध्यातरी बँकांच्या गृह कर्ज आणि कार कर्जाच्या ईएमआयमध्ये वाढ होणार नाही, हा सर्वसामान्यांसाठी एकमेव दिलासा आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी महागाईबाबत दिलेला अंदाज चिंता वाढवणारा आहे. वित्त वर्ष २०२७ च्या तिसऱ्या तिमाहीत महागाईचा अंदाज ४.७ टक्क्यांवरून थेट ५.२ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०८ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १९३.०० क्विंटल | १९२.०० | २,०३४ | २,३५३ |
| ज्वारी/हायब्रिड: १२७.०० क्विंटल | १,७०० | ४,२८० | ३,१०७ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.५० क्विंटल | ७,४३० | ७,४३० | ७,४३० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरीः १०९.०० क्विंटल | २,००० | २,९०१ | २,५४४ |
| मुगः २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीनः १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभराः १२.०० क्विंटल | ५,०७० | ५,१५६ | ५,११० |

## लालपरीच्या तिकीट दरात हंगामी वाढ !




मुंबई I प्रतिनिधी

एसटीने सुट्टीत प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी खिशाला चाट देणारी बातमी दिली आहे. एसटी महामंडळानं उन्हाळ्याच्या सुट्ट्या लक्षात घेता आणि त्यामुळं होणारी गर्दी लक्षात घेता भाडेवाढ केली आहे. माहितीनुसार, साध्या बसेसच्या दरामध्ये दहा टक्के वाढ करण्यात आली आहे. १५ एप्रिल ते १५ जून या काळासाठी ही वाढ करण्यात आली आहे. फक्त साध्या बसेसला ही दरवाढ लागू होणार असून एसी किंवा शिवशाही, शिवनेरी तसंच शिवाई बसेसला ही दरवाढ लागू होणार नाही.

राज्य परिवहन मंडळाने एसटी महामंडळाला विशिष्ट कालावधीत भाडेवाढ करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार एसटी महामंडळानं उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये साध्या बससेवा प्रवास भाडे दरात दरवाढ केलीय. दहा टक्के इतकी दरवाढ करण्यात आली आहे. यात्रा, सणासुदीचा काळ, सुट्ट्या, सप्ताह अखेर या कालावधी दरम्यान ३० टक्के दरवाढ करण्यास मान्यता ▶▶ पान २ वर

## दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा ; भारताकडून स्वागत



दिल्ली I प्रतिनिधी

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील बॉम्बफेक आणि हल्ले थांबवल्याचे जाहीर केले. त्यांनी दोन आठवड्यांच्या दुहेरी युद्धविरामाची घोषणा केली असून, इराणने सादर केलेला १० कलमी प्रस्ताव चर्चेसाठी योग्य असल्याचे म्हटले आहे.**

ट्रुथ सोशलवर पोस्ट करताना ट्रम्प यांनी नमूद केले की, हा १० कलमी प्रस्ताव कायमस्वरूपी करारासाठी पाया म्हणून काम करेल. त्याच वेळी, अमेरिकेने ▶▶ पान २ वर

### युद्धविरामातही इराण विजयी– डॉ.अब्दुल मजीद हकीम इलाही

इराणच्या सर्वोच्च नेत्यांचे भारतातील प्रतिनिधी यांनी ठामपणे सांगितले की, तेहरान हे युद्धाचे ‘‘विजेते’’ आहेत आणि मोजतबा खामेनी यांच्या प्रकृतीबद्दलच्या अटकळी फेटाळून लावल्या. ते सर्व गोष्टींवर देखरेख करत असल्याचे त्यांनी सांगितले. एका विशेष मुलाखतीत, डॉ. अब्दुल मजीद हकीम इलाही यांनी यावर जोर दिला की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच ‘‘शरणागती’’ पत्करली आणि युद्धविरासाठी इराणच्या सर्व अटी स्वीकारल्या. ही वक्तव्ये अशा दिवशी आली आहेत, ज्या दिवशी महिनाभराच्या लढाईनंतर अमेरिका आणि इराणमध्ये दोन आठवड्यांच्या युद्धविरामाचा करार झाला, ज्यात २,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

## राज्यात शनिवारपासून ‘पटपडताळणी’

### बनावट विद्यार्थी व शाळा शोधण्यासाठी आवश्यक, तीन टप्प्यांत प्रक्रिया



मुंबई I प्रतिनिधी

राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक नोंद आणि उपस्थितीची खात्री करण्यासाठी शिक्षण विभागाने ‘पटपडताळणी’ मोहिमेला वेग दिला असून ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ या तीन टप्प्यांत ही प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे बनावट विद्यार्थी व शाळा शोधण्यासाठी शिक्षण संचालनालयाने पुन्हा एकदा निर्णय घेतला असून यामध्ये इयत्ता दुसरी ते नववी आणि अकरावीच्या वर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

३१ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या आदेशानुसार, राज्यातील शाळांमध्ये विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांची पटपडताळणी विशिष्ट तारखांना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ही पडताळणी परीक्षा काळातच करण्याचे नियोजन असल्याने शिक्षकांची मोठी कोंडी झाली आहे. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा सुरू असताना मराठी, इंग्रजी आणि ▶▶ पान २ वर

### ऐन सुटीच्या दिवसांत काम

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणीही ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. या कालावधीत अनेक शाळांमधील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा संपून त्यांना सुट्या लागलेल्या असण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऐन सुटीच्या कालावधीत शाळेमध्ये उपस्थित राहावे लागेल.

## एमपीएससी परीक्षेत सोलापूरचा डंका



मुंबई I प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल बुधवार दि. ८ एप्रिल रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लामकाने हे सर्वसाधारण तथा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम, तर सोलापूर जिल्ह्यातीलच आरती परमेश्वर जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत. ▶▶ पान २ वर

## मस्साजोगची निवडणूक बिनविरोध होणार का?

### स्व.संतोष देशमुखांच्या पत्नी आज अर्ज भरणार



केज I प्रतिनिधी

तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला १ वर्षाचा कालावधी उलटला असून, या प्रकरणातील आरोपी तुरुंगात आहेत. दुसरीकडे आता, येथील ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. मस्साजोगचा नवा सरपंच कोण याची उत्सुकता सर्वांनाच आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेच गावचा कारभार हाती घेतील का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती. मात्र, आता मस्साजोगच्या सरपंच पदासाठी दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. ▶▶ पान २ वर

## तुकाराम मुंढेंची बदली रद्द करा

### दिव्यांग बांधवांनी काढला धडक मोर्चा

नांदेड I प्रतिनिधी

दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिव पदावरुन बदली करण्यात आलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली रद्द करण्याच्या मागणीसाठी दिव्यांग बांधवांनी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन सूरू केले. विशेष म्हणजे तुकाराम मुंढेंच्या बदलीनंतर मुंबईतील मंत्रालय परिसरात देखील दिव्यांग बांधवांनी असेच आंदोलन करत बदली रद्द करण्याची मागणी केली होती.



सध्या राज्य सरकारने सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावला आहे. ▶▶ पान २ वर

# तुम्ही कायद्याचे तज्ज्ञ आहात, धर्माचे नाही!

## शबरीमला प्रकरणी सरन्यायाधीशांच्या पीठासमोर केंद्राचा युक्तिवाद

नवी दिल्ली I वृत्तसंस्था

**कोणत्याही धर्मातील एखादी प्रथा ही अंधश्रद्धा आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नोंदवले. धर्मविषयक बाबींवर निर्णय घेणे न्यायालयाच्या अधिकारकक्षेत येत नाही, कारण न्यायाधीश हे कायद्याचे तज्ज्ञ असतात, धर्माचे नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला होता. या युक्तिवादाला उत्तर देताना न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट केली.**

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांचे घटनापीठ सध्या केरळच्या शबरीमला मंदिरासह विविध धार्मिक स्थळांवरील महिलांच्या प्रवेशाशी संबंधित भेदभाव आणि धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती यावर सुनावणी ▶▶ पान २ वर



### न्यायाधीश हे कायद्याचे तज्ज्ञ आहेत, धर्माचे नाही–सॉलिसिटर

सॉलिसिटर जनरल मेहता यांनी आपल्या युक्तिवादात म्हटले की, एक धर्मनिरपेक्ष न्यायालय एखाद्या धार्मिक प्रथेला अंधश्रद्धा ठरवू शकत नाही, कारण त्यांच्याकडे धार्मिक बाबींमध्ये तज्ज्ञता नसते. माननीय न्यायाधीश हे कायद्याचे तज्ज्ञ आहेत, धर्माचे नाही. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या समाजात एका ठिकाणी जी बाब धार्मिक असते, ती दुसऱ्या ठिकाणी अंधश्रद्धा मानली जाऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

### “ ... तर त्याला अंधश्रद्धा मानले जाणार नाही का?–न्या. बागची

यावेळी न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी विचारले की, जर जादूटोणा हा एखाद्या धर्माचा भाग असल्याचे सांगितले गेले, तर त्याला अंधश्रद्धा मानले जाणार नाही का? अशा प्रकरणात जर विधिमंडळ गप्प असेल, तर न्यायालय सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या आधारावर हस्तक्षेप करू शकत नाही का? यावर उत्तर देताना मेहता म्हणाले की, न्यायालय पुनरावलोकन करू शकते, परंतु ते अंधश्रद्धेच्या आधारावर नाही, तर केवळ आरोग्य, नैतिकता आणि सार्वजनिक सुव्यवस्था या निकषांच्या आधारावर असावे.

## मुंबईत १०.१४ कोटींचे ड्रग्ज जप्त

मुंबई I प्रतिनिधी

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा मुंबई यांनी विशेष मोहिम राबवत शहरातील विविध ठिकाणी धडक कारवाई करून तब्बल १० आरोपींना अटक केली. या कारवाईत एकूण २९.२९२ किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे किंमत १० कोटी १४ लाख ४६ हजार १०० रुपये इतकी आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईदरम्यान ९०२ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन), २०.७०० किलो गांजा आणि ७.६९० किलो हायड्रोपोनिक गांजा असा मोठा साठा हस्तगत करण्यात आला आहे. १ एप्रिल २०२६ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत वडाळा, अंधेरी, बांद्रा, मालाड, नागपाडा, घाटकोपर, धारावी, माहिम, गोरेगाव आदी ठिकाणी छापेमारी करण्यात आली. वडाळा परिसरात एमडी विक्री करणाऱ्या आरोपीकडून ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# अवकाळी थैमान : कष्टावर पाणी शेतकरी हवालदिल

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीच्या तडाख्याने शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. ऐन कापणीच्या आणि तोडणीच्या हंगामात निसर्गाने घेतलेल्या या पलटीमुळे बळिराजाच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे. द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांसह गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या रबी पिकांचे झालेले मोठे नुकसान केवळ शेतीपुरते मर्यादित नसून त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थचक्रावर होणार आहेत.

सांगली, सोलापूर, फलटण, सांगोला, बारामती, इंदापूर या द्राक्षपट्ट्यांमध्ये गारपिटीने अक्षरशः थैमान घातले. तोडणीच्या उंबरठ्यावर असलेल्या द्राक्षबागांमधील मण्यांना तडे जाऊन मालाचा दर्जा घसरला. निर्यातक्षम द्राक्षांचे नुकसान झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी हुकल्या आणि स्थानिक बाजारात दर कोसळले. कष्टाने पिकवलेला माल कवडीमोल दराने विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जळगाव परिसरात वादळी वाऱ्याने केळीच्या बागा जमीनदोस्त केल्या, तर मराठवाड्यात आंबा बागांना मोठा फटका बसून उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांची घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.या संकटाची व्याप्ती केवळ फळबागांपुरती मर्यादित नाही. गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी काढणीला आलेली पिके आडवी पडली आहेत. कांदा आणि भाजीपाला पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील सुमारे १.२२ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली आहेत. ही आकडेवारी केवळ संख्या नसून हजारो शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या स्वप्नांची साक्ष आहे. निसर्गाच्या या लहरीपणामागे हवामान बदलाचे वाढते संकट स्पष्ट दिसते. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार अरबी समुद्रातून येणारे बाष्पयुक्त वारे आणि स्थानिक कमी दाबाचे पट्टे यामुळे राज्यात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. यामुळेच अवकाळी पावसाचे प्रमाण वाढत असून त्याची तीव्रताही अधिक होत आहे. ही केवळ एक तात्पुरती आपत्ती नसून भविष्यात अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकणारा इशारा आहे.शासनाने परिस्थितीची दखल घेत पंचनामे करण्याचे आणि मदत देण्याचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्षात मदतीचा वेग आणि पारदर्शकता यावरच शेतकऱ्यांचा विश्वास टिकून आहे. अनेकदा अशा आपत्तीनंतर मदत उशिरा मिळते किंवा ती अपुरी ठरते, हा अनुभव शेतकऱ्यांनी वारंवार घेतला आहे. त्यामुळे यावेळी तातडीने, पुरेशी आणि थेट मदत देणे अत्यंत आवश्यक आहे. विमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पीकनुकसान भरपाईचे योग्य मूल्यांकन आणि कर्जमाफीसारख्या उपाययोजना तातडीने राबवणे गरजेचे आहे. यासोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर देणे तितकेच महत्त्वाचे आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धती, हवामानानुसार पीकपद्धतीत बदल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि जलव्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. फळबागांसाठी संरक्षक जाळ्या, हरितगृह शेती, तसेच हवामान पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. अवकाळी पावसाचा हा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आहे. शेतकरी अडचणीत सापडला तर त्याचा परिणाम बाजारपेठ, रोजगार आणि अन्नपुरवठ्यावर होतो. त्यामुळे या संकटाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता व्यापक आर्थिक आणि सामाजिक संकट म्हणून पाहणे गरजेचे आहे.आज बळिराजा पुन्हा एकदा संकटात उभा आहे. त्याच्या डोळ्यांतील आशा आणि कष्टांचे चीज होण्याची अपेक्षा या अवकाळी पावसाने धुळीस मिळवली आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि समाजाने एकजुटीने पुढे येऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच खरी काळाची गरज आहे. नाहीतर ''शेतकरी वाचला तर देश वाचेल'' ही घोषणा केवळ घोषणाच राहण्याचा धोका आहे.

# अशोक दादा रसाळ म्हणजे स्वाभिमान आणि एकनिष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण

**अशोक दादा रसाळ हे नाव आज बीड तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त झाले आहे. २०१४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. भारतीय जनता पार्टीचे विचार देशहिताचे आहेत, हे जाणून त्यांनी त्या विचारांना स्वीकारले आणि तेव्हापासून सक्रियपणे मा. मंत्री पंकजाताई मुंडे साहेब व डॉ. प्रीतम ताई मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली कार्यास सुरुवात केली.**



समाजकारणातून आपल्या कार्याची सुरुवात करणाऱ्या अशोक दादांनी राजे छत्रपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजसेवा केली. विविध महापुरुषांच्या जयंती साजऱ्या करून त्यांच्या विचारांचे बीज युवकांमध्ये रुजवण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. काम करत असताना समाजातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी राजकीय पाठबळ आवश्यक असल्याचे लक्षात येताच, त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला. डॉ. प्रीतम ताई यांच्या माध्यमातून त्यांनी अनेक तरुणांचे प्रश्न सोडवले आणि आज बीड तालुक्यातील युवकांचे स्वाभिमानी, निस्वार्थी नेतृत्व म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज अशोक दादांकडे कोणताही युवक आपली समस्या घेऊन आला, तर तो कधीही निराश परत जात नाही, याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक युवक चांगल्या कामांकडे वळत आहेत, तसेच विविध योजनांच्या माध्यमातून उद्योजकतेकडेही वाटचाल करत आहेत. दोन्ही ताई साहेबांचा त्यांच्यावर असलेला विश्वास आणि त्यांच्या एकनिष्ठ कार्यपद्धतीमुळेच त्यांची बीड मंडळ अध्यक्षपदी निवड झाली. सामान्य कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी जिद्द, चिकाटी आणि वेळ देत आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आज पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी बीड तालुक्यात एक नवी ओळख निर्माण केली आहे. येणाऱ्या काळात हे नेतृत्व नक्कीच अधिक उंच भरारी घेईल, यात शंका नाही.

# गौरवाडी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गौरवाडी व घाडगेवस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले. परिसरात प्रथमच व्यापक प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.**



या कार्यक्रमाचे उद्घाटन केज पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुरज पटाईत होते. माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे, डॉ.शशिकांत दहिफळकर, दत्तात्रय ठोंबरे, माजी पं.स.सदस्य केज, प्राचार्य संजय मुंडे, धर्मराज ठोंबरे, बाळासाहेब चव्हाण, शंकर मुंडे, भागवत सोनवणे, बाबासाहेब केदार, अरुण शिंदे, रामकिसन सांगळे, बाळकृष्ण चोले, बंडु वरपे, संतोष घाडगे, श्रीमती मालणबाई घाडगे, अंकुश कलाने यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, नाटिका, देशभक्तीपर सादरीकरणे तसेच सामाजिक विषयांवरील कार्यक्रमांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक सुभाष सारुक, हाडुळे, श्रीमती बागर, भोसले, मोहन चौरे, दत्तात्रय वरपे, घुगे व भोसले आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# छ.संभाजी महाराज यांच्या स्मारकासाठी आ.संदीप क्षीरसागर आग्रही

## बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसलेंची भेट घेऊन निवेदन दिले

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील बायपासवर म्हणजेच महालक्ष्मी चौक येथे असलेला छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा अस्तित्वात आहे. परंतु छत्रपती संभाजीनगर येथील क्रांतीचौकाच्या धर्तीवर बीडमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व्हावे यासाठी आ. संदीप क्षीरसागर आग्रही असून, यासाठी त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची बुधवारी (दि.८) सकाळी भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली आणि निवेदन दिले आहे.**

बीड शहरातून जाणारा सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग आहे. शहरात वाहनांची वर्दळ वाढू नये म्हणून खजाना बावडी ते रामनगर असा बायपास रस्ता करण्यात आला आहे. परंतु या बयपासवर शहरात प्रवेश करण्यासाठी असलेल्या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल नसल्याने नियमित अपघाताच्या घटना घडत होत्या. तसेच काही ठिकाणी स्लीप रोड नसल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या अपघात आणि त्रासातून सुटका व्हावी म्हणून आ. संदीप क्षीरसागर प्रयत्नशील होते. यासाठी शहरात प्रवेश करण्याच्या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि आवश्यक ठिकाणी स्लीप रोडसाठी त्यांचा पाठपुरावा सुरू होता. यासाठी त्यांनी शासन, प्रशासन आणि आ. संदीप क्षीरसागर व माजी आ. सय्यद सलीम यांनी यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि स्लीप रोडचे काम सध्या सुरू आहे. त्यानंतर आता आ. संदीप क्षीरसागर यांनी बायपासवर महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याची उंची वाढवून सुसज्ज स्मारक व्हावे अशी मागणी केली आहे. यापूर्वी आ.क्षीरसागर यांनी याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी केली होती. त्यानंतर आता सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बीड शहराच्या बायपास रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात यावे यासाठी सविस्तर निवेदन सादर केले. याबाबत सविस्तर माहिती दिली. लवकरच याबाबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. हे स्मारक झाले तर बीड शहराच्या वैभवात मोठी भर पडणार आहे.



# महापुरुषांच्या विचारांचा रंगोत्सव

## चित्रकला स्पर्धेतून विद्यार्थ्यांची सर्जनशील अभिव्यक्ती

**बीड । प्रतिनिधी**

महापुरुष चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.या स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी केवळ रंगरेषांमध्ये चित्रे रेखाटली नाहीत, तर महापुरुषांच्या विचारांचे जिवंत प्रतिबिंब साकारले. बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.त्याअनुषंगाने बुधवारी (दि.८) रोजी महापुरुष चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी.के.जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून गजानन चित्रे, अनिल डोळस, गौतम सोनवणे, डी. जी. वानखेडे, परिक्षक विशाल गायकवाड, संपादक विनोद शिंदे यांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मार्गदर्शन केले. महापुरुषांच्या महान व्यक्तिमत्त्वांचे प्रभावी चित्रण करताना विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सामाजिक जाणिवेला विशेष उंची मिळाल्याचे दिसून आले. प्रत्येक चित्रामागे एक विचार, एक प्रेरणा आणि एक संदेश दडलेला होता.या उपक्रमामागचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मनात महापुरुषांविषयी आदर, कृतज्ञता आणि त्यांच्या विचारांचे संस्कार रुजवणे हा असून, स्पर्धेच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणेचा ठेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.या स्पर्धेत संघवी जोगदंड (प्रथम), ज्योत्सना विद्यागर (द्वितीय), उमंग विद्यागर (तृतीय), समिक्षा सोनवणे (उत्तेजनार्थ), प्रियांश ससाणे (उत्तेजनार्थ), पौर्णिमा तांगडे (उत्तेजनार्थ) यांनी क्रमांक पटकाविला. या चित्रकला स्पर्धेचे प्रास्ताविक ॲड.तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड.राजेश शिंदे, प्रा.पांडुरंग सुतार यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन तानाजी शिनगारे यांनी केले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती प्रमुख सुमेध जोगदंड व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# मराठवाड्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी खा.डॉ. कल्याण काळे यांची रेल्वे मंत्रालयाकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**मराठवाडा विभागातील वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून प्रवाशांना अधिक सुलभ व सुरक्षित रेल्वे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे ईमेलद्वारे निवेदन सादर केले आहे.**

दरवर्षी एप्रिल ते जून या ग्रीष्मकालीन कालावधीत मराठवाडा (जालना, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, हिंगोली आदी) भागातून मुंबई, नाशिक, मडगाव, सूरत, अहमदाबाद, नागपूर, जोधपूर व कोल्हापूर या प्रमुख शहरांकडे प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय वाढते. सध्या उपलब्ध रेल्वेगाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, प्रवाशांना आरक्षण मिळण्यात तसेच प्रवासादरम्यान अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित मार्गांवर ग्रीष्मकालीन विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी नमूद केले आहे. या गाड्यांच्या सुरूवातीमुळे प्रवाशांची गर्दी कमी होऊन अधिक सुसूत्र व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच, जालना ते छपरा (बिहार) दरम्यान पूर्वी चालविण्यात आलेली ०७६५१/०७६५२ 'छपरा एक्सप्रेस' पुन्हा नियमित स्वरूपात सुरू करण्याबाबतही त्यांनी विशेष विनंती केली आहे. जालना हा औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून, उत्तर भारतातील अनेक कामगार येथे वास्तव्यास आहेत. सध्या थेट रेल्वेसेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अन्य स्थानकांवर गाडी बदलावी लागत असल्याने वेळ व कष्ट वाढत आहेत. प्रस्तावित मार्ग छत्रपती संभाजीनगर, मनमाड, इटारसी, जबलपूर व वाराणसी मार्गे निश्चित केल्यास प्रवाशांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल तसेच रेल्वेच्या महसुलातही वाढ होण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. मराठवाडा विभागातील नागरिकांच्या प्रवास सुलभतेच्या दृष्टीने या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केली आहे.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांना १२८ कोटी

स्पष्ट झाले आहे. जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा तयार झाला असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पांमुळे अतिरिक्त २.९५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जुलै २०२२ पासून आजपर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या मान्यता ४.३५ लाख कोटी रुपयांच्या असून हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होईल, अशी माहिती जलसंपदा विभागाने सादरीकरणाद्वारे दिली.

-------------

### दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची

आपली बहुतेक लष्करी उद्दिष्टे साध्य केली आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. ट्रम्प म्हणाले, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसीम मुनीर यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर आणि त्यांनी इराणवर होणारा विनाशकारी हल्ला रोखण्याची विनंती केल्यामुळे, मी हा निर्णय घेतला आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे, तत्काळ आणि सुरक्षितपणे खुली ठेवण्यास सहमती दर्शवल्यास, मी दोन आठवड्यांसाठी इराणवरील बॉम्बफेक थांबवण्यास तयार आहे. इराणने अमेरिकेचे हे शांतता प्रस्ताव स्वीकारले असून दोन आठवड्यांसाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित प्रवासाची हमी दिली आहे, तसेच लष्करी कारवाया थांबवण्यासही सहमती दर्शवली आहे.इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी एक्सवर प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, जोपर्यंत इराणवर हल्ला होत नाही, तोपर्यंत इराण आपल्या लष्करी कारवाया थांबवेल. दरम्यान, भारताने या निर्णयाचे स्वागत केले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, या पावलामुळे पश्चिम आशियात दीर्घकालीन शांततेचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.भारताने आपल्या प्रतिक्रियेत स्पष्ट केले की, सध्याच्या संघर्षामुळे सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला असून जागतिक ऊर्जा पुरवठा आणि व्यापार व्यवस्थेवरही त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. विशेषतः होर्मुज सामुद्रधुनीतील वाहतूक सुरळीत राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही भारताने नमूद केले.

--------------

### लालपरीच्या तिकीट दरात

एसटी महामंडळाला मिळाली आहे. या अनुषंगानं एसटी महामंडळानं उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये ही दरवाढ लागू केली आहे. वातानुकूलित शिवनेरी, शिवशाही तसंच शिवाई या बससेवासह निम आराम (हिरकणी) आणि शयनयान बसेसची तिकीट दरवाढ केलेली नाही. दरम्यान, साधा बससेवा प्रकार वगळता निमआराम, विनावातानुकुलीत शयनआसनी, विनावातानुकुलीत शयनयान, शिवशाही (वातानुकुलीत), शिवनेरी (वातानुकुलीत), ९ मीटर ई-बस (वातानुकुलीत), १२ मीटर ई-बस,ई-डिवाई (वातानुकुलीत) या बससेवा प्रकाराच्या प्रवासभाड्यात उन्हाळी गर्दीच्या हंगाम कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.

--------------

### एमपीएससी परीक्षेत

सदर परीक्षा दि. २७ ते २९ मे २०२५ रोजी घेण्यात आली होती. त्यातून विविध २० संवर्गांतील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. सदर निकाल आणि प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा समावेश अंतिम निकालात केलेला नाही. दिव्यांग, अनाथ, खेळाडू, मागास, इत्यादींसाठी आरक्षित पदावर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे, अशी माहिती राजपत्रित परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे उपसचिव सं. पां. देशमुख यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

---------------

### राज्यात शनिवारपासून

विज्ञान विषयांच्या दिवशीच पटपडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. इयत्ता पहिली ते आठवीसाठीही ११, १५ आणि २२ एप्रिल या कालावधीत पडताळणी करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या काळातच संबंधित इयत्तांच्या परीक्षा देखील आयोजित करण्यात येत असल्याने शिक्षकांवर दुहेरी जबाबदारी येणार आहे. इयत्ता नववीसाठी पूर्व-प्रगत चाचणी (पॅट) च्या दिवशीही पटपडताळणी करण्याचे आदेश आहेत. म्हणजेच, विद्यार्थ्यांच्या परीक्षांसोबतच उपस्थिती तपासण्याचे अतिरिक्त काम शिक्षकांना करावे लागणार आहे. शासनाने या प्रक्रियेसाठी स्वतंत्र पोर्टलवर मुख्याध्यापक, क्लस्टर हेड, बीईओ आणि शिक्षणाधिकारी यांना लॉगिनची सुविधा दिली असली, तरी प्रत्यक्षात शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवण्याची जबाबदारी शिक्षकांवरच टाकण्यात आली आहे. पटपडताळणीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षण विभागासोबतच जिल्हा परिषदेच्या इतर विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत घेण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. यासाठी संबंधित जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची सूचना करण्यात आली आहे.

------------

### तुकाराम मुंढेंची बदली रद्द करा

मंगळवारी आणखी ११ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. याआधी गेल्याच आठवड्यात २५ आयएएस अधिकाऱ्यांची बदल्या करण्यात आली होत्या.यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. तर तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली आहे. मात्र, दिव्यांग विभागाचे सचिव असताना दिव्यांगांसाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे दिव्यांग बांधवांनी त्यांच्याप्रती आदर व्यक्त करत त्यांची बदली रद्द करण्याची मागणी केली. तसेच,नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात आज विधिमंडळ अंदाज समितीची बैठक पार पडली. या बैठकीत दिव्यांग बांधव मुंढे यांच्या बदलीवरून आक्रमक झाल्याचे दिसून आले.

------------

### मस्साजोगची निवडणूक बिनविरोध

मस्साजोग सरपंच पोटनिवडणुकीत सरपंच पदासाठी दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी आपला उमदेवारी अर्ज दाखल करणार आहेत. देशमुख कुटुंबीयांनी एकमताने आणि ग्रामस्थांशी विचार विनिमय, चर्चा करुन अश्विनी देशमुख यांचे नाव निश्चित केले आहे. त्यानुसार, सरपंच पदासाठी त्या आपला उमेदवारी अर्ज साध्या पद्धतीने दाखल करणार आहेत. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मस्साजोगचे सरपंच पद रिक्त झाले होते. आता, नव्याने गावचा कारभार हाती घेणाऱ्या नवीन सरपंचांचा कालावधी १८ महिने इतका असणार आहे. मस्साजोग सरपंच पोटनिवडणुकीच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून, संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा अर्ज भरुन त्यांना बिनविरोध सरपंच पद द्यावे अशी गावकऱ्यांची अपेक्षा आहे. संतोष देशमुख यांच्या पत्नीला सरपंच पद देणे हीच खरी संतोष देशमुख यांना श्रद्धांजली असणार आहे, अशी गावतील महिला वर्गाचीही मागणी आहे. तर, त्यांना सरपंचपदाचा अनुभव असल्याचेही सांगितले जाते. दरम्यान, येथील सरपंचपदाची निवडणूक बिनविरोध होणार की मतदान होणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

--------------

### मुंबईत १०.१४ कोटींचे

२१८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. तसेच विलेपार्ले परिसरातून ७.६९० किलो हायड्रोपोनिक गांजा हस्तगत करण्यात आला. वडाळा टीटी परिसरात २०.७०० किलो गांजा जप्त करण्यात आला, तर नागपाडा भागातून ११७ ग्रॅम एमडी जप्त केले.

------------

### तुम्ही कायद्याचे तज्ज्ञ आहात,

करत आहे. बुधवारी (दि. ८) सुनावणीच्या सुरुवातीला केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सवाल उपस्थित केला की, एखादी प्रथा अंधश्रद्धेवर आधारित आहे हे न्यायालय कसे ठरवू शकणार? मेहता म्हणाले की, समजा एखादी प्रथा अंधश्रद्धेवर आधारित आहे, तरीही ते ठरवणे न्यायालयाचे काम नाही. संविधानाच्या अनुच्छेद २५(२) नुसार, सुधारणांसाठी कायदा करण्याचे काम विधिमंडळाचे आहे. संसद किंवा विधानसभा जादूटोणा विरोधी कायद्यांप्रमाणे कोणत्याही प्रथेला अंधश्रद्धा मानून त्याविरुद्ध कायदा करू शकतात. यावर न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांनी आक्षेप घेतला. ते म्हणाले की, न्यायालयाकडे एखादी प्रथा अंधश्रद्धा आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार आहे. त्यानंतर काय पाऊल उचलायचे हे विधिमंडळ पाहू शकते, परंतु विधिमंडळ जे ठरवेल तेच अंतिम असेल, असे म्हणता येणार नाही. वादाच्या ओघात न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी सुचवले की, कोणत्याही धार्मिक प्रथेला समजून घेण्यासाठी त्याच धर्माच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला पाहिजे. दुसऱ्या धर्माच्या नजरेतून एखाद्या प्रथेला अनावश्यक ठरवता येणार नाही. मात्र, या सर्व गोष्टी आरोग्य, नैतिकता आणि सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन असाव्यात.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ९ एप्रिल २०२६


## थोडक्यात

### पाटोदा येथे भाजपाचा ४६ वा स्थापना दिन उत्साहात साजरा



पाटोदा: भारतीय जनता पार्टीच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त पाटोदा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष श्री. राजू भैय्या जाधव यांच्या निवासस्थानी भाजपाचा अधिकृत ध्वज फडकवून आणि अभिवादन करून स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या भारतीय जनता पार्टीने गेल्या ४६ वर्षांत राष्ट्रभक्ती, जनसेवा आणि वैचारिक अधिष्ठानाच्या जोरावर राजकारणात अभूतपूर्व यश संपादन केले आहे. या प्रवासाचा आढावा घेताना नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव म्हणाले की, "कोट्यवधी कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम, त्याग आणि निष्ठेच्या बळावर आज भाजपा जगातील सर्वात मोठी राजकीय संघटना म्हणून दिमाखात उभी आहे. स्थापना दिनानिमित्त आयोजित या छोटेखानी कार्यक्रमात भाजपाचा ध्वज उभारून पक्षाच्या ध्येयधोरणांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी ४६ वर्षे समर्पणाची, ४६ वर्षे भाजपाची अशा भावना व्यक्त करत पक्षाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी परिसरातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### तालुका काँग्रेसची शुक्रवारी महत्त्वपुर्ण बैठक मोठ्या संख्येने उपस्थित रहा – गणेश बजगुडे



बीड : अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या आदेशाने सुरु असलेल्या संघटन सृजन अभियान अंतर्गत बीड तालुका काँग्रेस कमिटीची बैठक दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी दुपारी ११ वाजता शासकीय विश्रामगृह बीड याठिकाणी होत असुन याबैठकीस अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने बीड जिल्हा निरीक्षक श्रीमती नितु वर्मा मॅडम (नवी दिल्ली) याप्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. त्याच बरोबर संघटन निरीक्षक माजी आमदार एम एम शेख, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुरेंद्रजी घोडजकर, प्रदेश सरचिटणीस श्रीमती विद्याताई पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी बीड तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.

### मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी निहाल नौशाद सय्यद



गेवराई : सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्य करणारे गेवराई येथील निहाल नौशाद सय्यद यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटना, बीड जिल्हा यांच्या वतीने गेवराई तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे गेवराई तालुक्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.सामाजिक प्रश्नांची चांगली जाण व समाजासाठी सातत्याने कार्य करण्याची तळमळ लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांच्या मान्यतेने तसेच मराठवाडा अध्यक्ष मा. दानिश भाई कुरेशी यांच्या सूचनेनुसार बीड जिल्हाध्यक्ष सद्दाम भाई पठाण यांनी निहाल नौशाद सय्यद यांची गेवराई तालुकाध्यक्षपदी निवड जाहीर केली. या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व युवक संघटनांकडून निहाल नौशाद सय्यद यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# बीड नगर पालिकेच्या ताफ्यात अद्यावत स्वच्छता वाहन

## नव्या सत्ताधाऱ्याकडून लोकसेवेत दाखल, आ.पंडित व जिल्हाधिकारी यांचे आभार –पारवे, मुळूक

बीड । प्रतिनिधी

शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला बळकटी देणारी अत्याधुनिक आपत्कालीन स्वच्छता प्रतिसाद गाडी आज नगरपालिकेच्या ताफ्यात दाखल झाली असून,स्व.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मा.ना.पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या आदेशानुसार मा.आमदार विजयसिंह पंडित व मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या पुढाकारातून ही गाडी बीड नगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाबद्दल नगरपालिका प्रशासनाच्या वतीने आ.विजयसिंह पंडित साहेब ,जिल्हाधिकारी साहेबांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



या गाडीचा अधिकृत शुभारंभ नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक,स्वच्छता सभापती शेख निजाम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, प्रवक्ते भागवतजी तावरे, नगरसेवक,जैतुल्ला खान,शेख अशफाक इनामदार, मनोज गोडसे, नगरसेवक दत्ता जाधव यांच्यासह सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या गाडीचे प्रात्यक्षिक पाहून तिच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेली ही गाडी शहरातील गटार साफसफाई, सांडपाणी व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. गाडीत उच्च क्षमतेचे व्हॅक्युम सक्शन सिस्टम, हाय-प्रेशर जेटिंग मशीन, पाणी व कचरा साठवण टाक्या तसेच आधुनिक पाईप व नोजल प्रणाली उपलब्ध असून, त्यामुळे गटारातील अडथळे जलदगतीने दूर करणे शक्य होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात गटारे तुंबणे व पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होतात, अशा वेळी ही गाडी तत्काळ कार्यरत होऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यास मदत करणार आहे.

यावेळी स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी या गाडीच्या फायद्यांबाबत सांगितले की, १) गटार साफसफाई अधिक जलद व प्रभावी पद्धतीने होणार, २) कामगारांना गटारात उतरावे लागणार नाही, त्यामुळे सुरक्षितता वाढणार, ३) हाय-प्रेशर जेटिंगमुळे अडथळे त्वरित दूर होणार, ४) आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होणार, ५) पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार, ६) स्वच्छता व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढणार, ७) वेळ, मनुष्यबळ व खर्चाची बचत होणार आणि ८) शहर अधिक स्वच्छ व आरोग्यदायी राहण्यास मदत होणार.

या गाडीच्या वापरामुळे गटार साफसफाईसाठी कामगारांना प्रत्यक्ष गटारात उतरावे लागणार नाही, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेला मोठे प्राधान्य मिळणार आहे. यंत्राद्वारे कामे पार पडल्यामुळे स्वच्छता व्यवस्थेत गती, कार्यक्षमता आणि सुरक्षितता या तिन्ही बाबींमध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे. येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही गाडी नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार असून, आपत्कालीन परिस्थितीतही तत्काळ प्रतिसाद देण्यास सक्षम ठरणार आहे. तसेच, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी मांडलेली बीड शहर स्वच्छ व सुस्थितीत असले पाहिजे ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून पालकमंत्री नामदार सुनेत्राताई पवार तसेच आमदार विजयसिंह पंडित हे या दिशेने कटिबद्ध असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. नगरपालिका प्रशासनाने या अत्याधुनिक गाडीचा प्रभावी वापर करून शहर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. एकूणच, ही गाडी बीड शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरेल.

# योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद-राजकिशोर मोदी

## वधु–वर परिचय पुस्तिका प्रकाशन, समाजभूषण पुरस्कार वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या विवाह समस्ये विषयी जागरूकता निर्माण करीत अनेक विवाह जुळविणाऱ्या योगेश्वरी वधु-वर मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते ०६ एप्रिल सोमवार रोजी भट गल्लीतील राम मंदीरात योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वधु-वर परिचय पुस्तिका प्रकाशन व समाजभुषण पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.



अध्यक्षस्थानी राम मंदीर चे मठाधिपती गदाधर बुवा रामदासी होते. व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, दिनदयाळ ना. सह.बँकेचे अध्यक्ष ॲड. मकरंद पत्की,माजी नगरसेवक संजय लोणीकर,ह.भ. प. अंबादास महाराज चिक्षे,योगेश्वरी देवल कमेटीचे संचालक उल्हास पांडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मोदी म्हणाले की,सामाजिक क्षेत्रात योगेश्वरी वधु-वर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने सामाजिक जबाबदारीचे जे बहुमोल कार्य केले आहे ते अवर्णनीय आहे. त्यांच्या प्रयत्नातून अनेक विवाह जुळले अलिकडच्या काळात वधु वर सूचक मंडळ काळाची गरज बनल्याचे सांगून ज्यांना समाजभुषण पुरस्कार मिळाले त्यांची जबाबदारी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. मकरंद पत्की म्हणाले की,योगेश्वरी वधु-वर सुचक मंडळाच्या वतीने विवाह जुळविण्याचे काम होते ही आताच्या काळात मोठी गोष्ट असल्याचे सांगून समाजभूषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे त्यांनी अभिनंदन केले.अंबादास चिक्षे यांनीही मंडळाचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगून समाजभूषण पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे अभिनंदन केले.

अध्यक्षीय समारोपात गदाधर बुवा रामदासी यांनी वधु-वर सूचक मंडळाच्या कार्याचे कौतुक करून समाज भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. मान्यवरांचे स्वागत बाबुराव बाभुळगावकर,अशोक टाकळकर,राहूल देशपांडे,राजश्री पिंपळे,कल्याणी सोनेसांगवीकर, आदींनी केले.प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले संचालन आनंद टाकळकर यांनी तर उपस्थितांचे आभार स्मिता भातलवंडे यांनी मानले. यावेळी विविध संघटनाचे पदाधिकारी संचालक,महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


यांना प्राप्त झाले पुरस्कार

अध्यात्मिक कार्य – कमलाकर देशपांडे,वधु-वर सूचक मंडळ कार्य-प्रभाकर सेलमोकर, सामाजिक कार्य-स्वरूपा कुलकर्णी, शैक्षणिक कार्य-एस.डी.खडके

### महात्मा फुले जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रम; डॉ. रामपाल महाराज धारकर यांचे व्याख्यान

माजलगाव । प्रतिनिधी

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सत्यशोधक विचारांची प्रेरणा देणाऱ्या या कार्यक्रमात समाज प्रबोधनकार डॉ. रामपाल महाराज धारकर यांचे व्याख्यान होणार असून भारताच्या संविधानाचेही वाटप करण्यात येणार आहे.



कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच अजय शिंदे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी युवा नेते दत्ता विसवळे राहणार आहेत. तसेच बाबुराव पोटभरे, माधव तात्या निर्मळ, ज्ञानेश्वर मेंडके, तुकाराम बापू येवले, कल्याणराव आबुज, डॉ. अशोक तिडके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

सामाजिक जागृती आणि समतेचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, किशोर पांचाळ यांनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### दबाव गट निर्माण करण्यासाठी

एक दबाव गट निर्माण व्हावे या शुद्ध आणि पवित्र भावनेतून राष्ट्रीय बंजारा महासंघाची महाराष्ट्रातील तमाम समाज बांधवांना सोबत घेऊन आज आम्ही स्थापना केले आहे.बंजारा समाजाला अनुसूचित जाती एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे, प्रत्येक तांड्यावर स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन व्हावी,बंजारा समाजाची बोलीभाषा गोरबोलीला राज्य भाषेचा दर्जा मिळावा, जनगणना मध्ये बंजारा समाजाची स्वतंत्र नोंद व्हावी,लोकसभा विधानसभा निवडणुकीत बंजारा समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात उमेदवारी तथा सत्तेत भागीदारी मिळावी,तांड्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा, बंजारा समाजातील विद्यार्थ्यांना एससी एसटी प्रवर्गाच्या धरतीवर शिष्यवृत्ती देण्यात यावी,पी.एम आवास योजनेतून प्रत्येक बंजारा बांधवांना घरकुल मिळावे,ऊसतोड कामगार व मुकादम मजुरीचे दर व कमीशन वाढवण्यात यावे,बंजारा समाजातील कवी लेखक साहित्यिक व प्रबोधक यांना दरमहा आर्थिक अनुदान देण्यात यावे,वसंतराव नाईक महामंडळाच्या माध्यमातून बंजारा समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना बिनव्याजी वीस लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून द्यावे, या व इतर महत्त्वाच्या प्रश्नांसाठी राष्ट्रीय बंजारा महासंघ भविष्यात काम करणार आहे,अशी माहिती राष्ट्रीय बंजारा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिकनभाऊ जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रा.पी.टी.चव्हाण, प्रदेश सरचिटणीस अमोलभाऊ पवार, प्रदेश कार्याध्यक्ष मधूकर भाऊ जाठोत यांनी दिली- स्थापना सोहळ्याला विकास जाधव,सुबोध पवार,निलकांत जाधव,राजू राठोड, महेश चव्हाण, संजय चव्हाण उपस्थित होते.

### समाजातील शेवटच्या घटकाला

काझी,कमलेश कांबळे, बंडू अडागळे, श्रीमंत कांबळे, रसीद शेख सह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुण कार्यकर्त्यांची लक्षनीय उपस्थिती : दत्ता कांबळे विश्वासपात्र

राष्ट्रीय काँग्रेस पक्ष्याच्या सदरील कार्यक्रमास जेष्ठासह तरुण कार्यकर्त्यांची लक्षनीय उपस्थिती यावेळी निदर्शनास आल्याने दत्ता कांबळे यांच्यावरील कार्यकर्त्यांचा विश्वास दृढ असल्याची कार्यकर्त्यांत चर्चा आहे.

### शेख रूक्सार युनुसची पोलिस

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शेख रूक्सार हिने शारीरिक चाचण्या, लेखी परीक्षा आणि मुलाखती अशा सर्व टप्प्यांवर यशस्वी वाटचाल करून ग्रामीण भागातील मुलींसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिच्या यशातून स्पष्ट झाले आहे. तिच्या या यशाचा आम्हाला अभिमान आहे.

तसेच, सामाजिक चळवळीतील सहका-याची लेक असल्याने ती सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेत कर्तव्य पार पाडेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कुटुंबियांची साथ लाख मोलाची – शेख रूक्सार युनुस

सत्कारमूर्ती शेख रूक्सार युनुस हिने आपल्या यशाचे श्रेय कुटुंबातील सदस्यांना देत त्यांच्या मोलाच्या साथीमुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. भविष्यात सामाजिक चळवळीतील सहका-यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाहीही तिने दिली. यावेळी शेख युनुस यांनी मुलीच्या सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानले.

# महात्मा फुले, डॉ. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन १० एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

बीड । प्रतिनिधी

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च –२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी 'बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती'च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.



क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च –२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मंजरथ येथे भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन –सचिन पाडमुख

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी बीड जिल्हा परिषद बांधकाम व अर्थ सभापती मा. जयसिंग भैया सोळंके हे असणार आहेत. उद्घाटक म्हणून तुळजाभवानी बँकेचे चेअरमन मा. चंद्रकांतजी शेजुळ उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना महाराष्ट्र राज्याचे नेते मा. विजयदादा साळवे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मा. मंगलजी पांडे सर उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजलगाव खरेदी-विक्री महासंघाचे उपाध्यक्ष भालचंद्र पाठक (मंजरथकर) यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तसेच मंजरथ गावचे सरपंच भागवत पोहेकर व उपसरपंच काशिनाथ आळसे हे देखील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून, प्रथम बक्षीस रुपये २५,५५५ हे मा. जयसिंग भैया सोळंके यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. द्वितीय बक्षीस रुपये १५,५५५ हे माजी पंचायत समिती सदस्य मा. दीपक भाऊ साळवे यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

तृतीय बक्षीस रुपये ११,१११ हे माजी सरपंच तुकाराम चोरमले यांच्या वतीने, तर चतुर्थ बक्षीस रुपये ७,७७७ हे सेवा सोसायटीचे चेअरमन दत्ता आस्वले यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे.

याशिवाय उत्कृष्ट चढाईसाठी रुपये ३,३३३ हे माजी उपसरपंच मा. निवृत्ती खरात यांच्या वतीने, तसेच उत्कृष्ट पकडीसाठी रुपये ३,३३३ हे माजी ग्रामपंचायत सदस्य मा. मारुती काळे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत.


या भव्य स्पर्धेत जास्तीत जास्त कबड्डी संघांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सचिन पाडमुख यांनी केले आहे.

# आदित्य डेंटल कॉलेजची यशाची परंपरा कायम; बीडीएस परीक्षेत विद्यार्थ्यांचा डंका

## तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के; नेहा निनायडे, अंजली पालवे आणि दिशा अजपुंजे कॉलेजमध्ये प्रथम

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य डेंटल कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या विद्यापीठ परीक्षांचे आयोजन मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात यशस्वीपणे पार पडले. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांनी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीची परंपरा कायम ठेवली आहे. विशेष म्हणजे तृतीय वर्ष बीडीएसचा निकाल १०० टक्के लागला. नेहा निनायडे, अंजली पालवे आणि दिशा अजपुंजे यांनी कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी विद्यार्थ्यांचे अभीनंदन केले.



दिशा अजपुंजे (1st year) · भक्ती सांखे (1st year) · कमल तनवाडे (1st year) · नेहा निनायडे (2nd year) · नेहा मिरकुटे (2nd year) · अश्विनी महाजन (2nd year) · अंजली पालवे (3rd year) · जान्हवी माळी (3rd year) · शरवरी लोखंडे (3rd year)

सर्व वर्षांतील निकाल अत्यंत समाधानकारक राहिला आहे. द्वितीय वर्ष बीडीएसचा निकाल ९५.७८ टक्के लागला. तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला. अंतिम वर्षाचा निकाल ८९.९१ टक्के लागला आहे. यामध्ये द्वितीय वर्ष: नेहा निनायडे (प्रथम- ५८८ गुण), नेहा मिरकुटे (द्वितीय), अश्विनी महाजन (तृतीय), तृतीय वर्ष: अंजली पालवे (प्रथम- ४२४ गुण), जान्हवी माळी (द्वितीय), शरवरी लोखंडे (तृतीय), अंतिम वर्ष: दिशा अजपुंजे (प्रथम- ११०५ गुण), भक्ती सांखे (द्वितीय), कमल तनवाडे (तृतीय) गुण मिळाले आहेत.

आरोग्य क्षेत्रात विद्यार्थ्यांनी नाव कमवावे

विद्यार्थ्यांनी यापुढेही आपले कौशल्य सिद्ध करत आरोग्य क्षेत्रात नाव कमवावे. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे.

–सुभाषचंद्रजी सारडा (संस्थापक अध्यक्ष, आदित्य एज्युकेशन ग्रुप)

शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि महाविद्यालयातील सकारात्मक शैक्षणिक वातावरणामुळेच हे यश साध्य झाले आहे. सर्व गुणवंतांचे अभिनंदन.

–डॉ. आदिती सारडा (संचालिका, आदित्य शिक्षण संस्था)

मार्गदर्शनामुळेच यश शक्य- नेहा निनायडे, द्वितीय वर्षात ५८८ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावता आला. याचे सर्व श्रेय सुभाषचंद्रजी सारडा, डॉ. आदिती सारडा, प्राचार्य डॉ. एम. रॉबर्ट जस्टिन, उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, डॉ. हरिकुमार यांच्या मार्गदर्शनाला जाते. सिनियर्सनीही मला खूप प्रेरणा दिली.

कॉलेजच्या सुविधांचा फायदा झाला- दिशा अजपुंजे

अंतिम वर्षात १६०० पैकी ११०५ गुण मिळवून यश मिळवता आले. संपूर्ण वर्षभर प्राचार्य डॉ. एम. रॉबर्ट जस्टिन, डॉ. हिमांशू श्रीवास्तव आणि शिक्षकांनी दिलेला पाठिंबा मोलाचा ठरला. महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या उत्तम सुविधांमुळेच हे यश शक्य झाले.

प्राध्यापकांचे ऋण सदैव राहील – अंजली पालवे

तृतीय वर्षात ६०० पैकी ४२४ गुण मिळवून प्रथम येण्याचे भाग्य मला लाभले. कॉलेज आणि सर्व प्राध्यापकांनी मला पावलोपावली मदत केली. विशेषतः प्राचार्य डॉ. एम. रॉबर्ट जस्टिन,डॉ. हिमांशू यांच्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन.

# तातडीने पंचनामे करून मदत द्या - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : मार्चअखेर आणि एप्रिलच्या सुरुवातीला झालेल्या पूर्वमोसमी पावसाने १ लाख ९४ हजार ३२९ शेतकऱ्यांच्या १ लाख २२ हजार ९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजानुसार स्पष्ट झाल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत आणि प्रस्ताव आल्यानंतर मदत द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

जानेवारीपासून झालेल्या पूर्वमोसमी पावसाने झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्यांची कार्यवाही सुरू असल्याची माहिती यावेळी प्रशासनाने दिली. दरम्यान, राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान, झालेल्या पूर्वमोसमी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहितीही या वेळी देण्यात आली. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या पूर्वमोसमी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत अधिक नुकसान झाले होते.



मार्चअखेर आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अवकाळी पावसामुळे २९ जिल्ह्यांमधील रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारीसह आंबा, काजू, संत्र्यासह फळपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या पूर्वमोसमी पावसामुळे एकूण १ लाख ४५ हजार ६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २ लाख ३३ हजार ८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले होते.

यात प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजी नगर, बुलडाणा आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या पावसामुळे पाच लोकांचा मृत्यू आणि नऊ लोक जखमी झाले.

तसेच, ३६ पशुधनांचाही मृत्यू झाला आहे. ज्या नुकसानीचे पंचनामे झाले आहेत, त्यांना तातडीने मदत द्यावी, असे निर्देशही यावेळी देण्यात आले. दरम्यान, जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा त्यामुळे उपलब्ध झाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या प्रकल्पांमुळे अतिरिक्त २.९५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

**३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होणार**

जुलै २०२२ पासून आजपर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित, तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या मान्यता ४.३५ लाख कोटी रुपयांच्या असून हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होईल, अशी माहिती जलसंपदा विभागाने सादरीकरणाद्वारे दिली.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपल्या सैनिकांना हिंदुची सर्व धार्मिक स्थळे, मंदिर, शाळा उध्वस्त करण्यास सांगितले.
१८६० : फ्रेंच देशातील प्रकाशक, पुस्तक विक्रेता आणि शोधक एडुअर्ड-लिओन स्कॉट डी मार्टिनविले यांनी सर्वप्रथम मानवी आवाजाचे ध्वनीमुद्रण केलं.
१८६७ : रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत 'एक' मताने मंजुरी मिळाली.
१९४० : दुसरे महायुद्ध : जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.
१९५३ : वॉर्नर बंधूंचा पहिला त्रिमितीय (३ ) चित्रपट, हाऊस ऑफ वॅक्स, प्रदर्शित झाला.
१९६७ : बोइंग-७६७ ने पहिले उड्डाण केले.
१९९४ : सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना 'आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान
१९९५ : लता मंगेशकर यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मोतीलाल व्होरा यांच्या हस्ते 'अवधरत्न' व साहू सूरसम्मान' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.
२००३ : इराक देशातील लोकांना सद्दाम हुसेन यांच्या तानशाही पासून मुक्ती मिळाली.
२००५ : प्रिन्स चार्ल्सचा कॅमिला पार्कर-बोल्सशी विवाह संपन्न.
२०११ : प्रख्यात भारतीय समाजसेवक अण्णा हजारे दिल्ली येथे लोकपाल बील कायदा पास करण्यासठी करीत असलेले आमरण उपोषण सरकारने आपली मागणी मान्य केल्यानंतर बंद केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग मंगोल सरदार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)
१७७० : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.
१८२८ : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (मृत्यू: २५ जुलै १८८०)
१८८७ : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ आक्टोबर १९५०)
१८९३ : राहूल सांकृतायन इतिहासकार (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)
१९२५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (मृत्यू: २१ आक्टोबर १९९५)
१९२९ : भारतीय पद्मभूषण, पद्मश्री, संगीत-नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित शरण राणी यांचा जन्मदिन.
१९३० : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म. १९४८: जया भादुरी अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

५८५ : ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)
१६२६ : सर फ्रँन्सिस बेकन इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (जन्म: २२ जानेवारी १५६१)
१६९५ : वैशाख शु. ६ शके १६१७ पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली. भर्तृहरीच्या शतकत्रयीचा अनुवाद आणि यथार्थदीपिका ही गीतेवरील टीका हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १६०७)
१९०१ : भारतीय रहस्यवादी, तत्वज्ञ, विद्वान, सुधारक व जैन कवी श्रीमद श्रीरामचंद्र यांनी समाधी घेतली.
१९५२ : प्रख्यात काश्मीर खोऱ्यातील कवी महजूर यांचे निधन.
१९८१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी दुर्गाबाई देशमुख यांचे निधन.
१९९४ : चंद्र राजेश्वर राव स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणाच्या लढ्याचे प्रवर्तक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९१४)
१९९८ : डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: २२ जून १९०८)
२००१ : बेहराम कॉन्ट्रॅक्टर ऊर्फ 'बिझी बी' पत्रकार व स्तंभलेखक, 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरियर' या सायंदैनिकाचे संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३०)
२००१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: ११ जुलै १९२१)
२००९ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (जन्म: १३ जानेवारी १९२६)
२००९ : अशोकजी परांजपे गीतकार (जन्म:)

# थारपारकर जातीच्या गायीचे पालन केल्यास होतो सर्वाधीक फायदा



गेल्या चार वर्षांत भारतातील दुग्ध व्यवसाय झपाट्याने ६.४ टक्के दराने वाढला आहे. तर जागतिक दुग्ध उत्पादनात केवळ १.७ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तर दूध उत्पादनात जागतिक स्तरावर केवळ १.७ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. थारापारकर या जातीच्या गायीमध्ये ४५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात जास्त दूध देण्याची क्षमता असते. प्रतिकूल परिस्थितीतही त्याच्या उत्पादन कार्यक्षमतेत काही फरक पडत नाही. जिथे वाढत्या तापमानासह, इतर जातीच्या गाई आणि जनावरांचे दूध उत्पादन २० ते ३० टक्के कमी होते. त्याच वेळी, ही जाती प्रतिकूल परिस्थितीतही अधिक दूध देण्यास सक्षम आहे. म्हणून थारपारकर जातीच्या गायीचे पालन केल्यास होतो सर्वाधीक फायदा.

त्याची उत्पादनक्षमता इतर जातींपेक्षा चांगली आहे. ती आयुष्यभर १५ मुलांना जन्म देऊ शकते, तर इतर जातींच्या गायी ५ ते १० मुलांना जन्म देऊ शकतात. उष्ण आणि कोरडे हवामान सहन करण्यास सक्षम, या जातीचे आयुष्य २५ ते २८ वर्षे आहे. ही जात मूळ राजस्थान राज्यातील आहे, ती येथे बाडमेर, जैसलमेर, जोधपूर, जालौन आणि सिरोही भागात आढळते. वास्तविक राजस्थानचा हा वाळवंट प्रदेश आहे, तो थार वाळवंट म्हणून ओळखला जातो. यामुळेच गायीच्या जातीला थारपारकर असे नाव पडले.

थारमध्ये आढळणाऱ्या गायींना थारपारकर म्हणतात. राजस्थानमध्ये याला मालानी या नावानेही ओळखले जाते. राजस्थान व्यतिरिक्त, देशाच्या विविध भागांमध्ये त्याचे संगोपन केले जाऊ शकते. राजस्थानचे थार वाळवंट एक उष्ण क्षेत्र आहे, येथील तापमान ५२ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदवले गेले आहे. हिवाळ्यात तापमान शून्य अंशांवर पोहोचते.

अशा परिस्थितीत या जातीची गाय उच्च व कमी तापमानाचा सामना करण्यास सक्षम आहे. राजस्थानच्या उष्ण हवामानात टिकून राहण्यास सक्षम, थारपारकर इतर प्रांतांमध्ये सहजपणे पाळले जाऊ शकते.

थारपारकर गायीची ओळख :

थारपारकर पांढरा आणि जाड डोळ्यांचा आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. देशी जातीची गाय दिसायला सुंदर आहे, पण या जातीची स्वतःची वेगळी ओळख आहे. जरी ते दिसायला पांढरे असले तरी हिवाळ्यात त्याच्या शरीरावर काळे केस वाढत असतात. थारपारकरचे डोके मध्यम आकाराचे असते आहे, कपाळ रुंद आहे आणि कपाळ उंच असते. या गायींची उंची सहिवाल आणि राठी जातीच्या गायींपेक्षा किंचित जास्त असते.

# नैसर्गिक शेतीसाठी नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र : करतील हानिकारक किडींचा अंत

कीड नियंत्रण ही नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीत सर्वात मोठी समस्या असते. परंतु काही नैसर्गिक घटकांचा वापर करून शेतकऱ्यांना या किडी आणि रोगांचे नियंत्रण करणे सोपे आहे. नैसर्गिक शेतीसाठी फायदेशीर आणि किडींचे नियंत्रण करणारे नीमस्त्र, ब्रह्मास्त्र आणि अग्निस्त्र हे कीटकनाशक असून, यांची उपयुक्तता आणि तयार करण्याची पद्धती याबद्दल माहिती करून घेतल्यास याचा मोठा फायदा होतो.

नीमस्त्र : नीमस्त्र एक कीड नियंत्रक नैसर्गिक काढा आहे. याचा उपयोग पिकावरील रस शोषणाऱ्या किडी/कीटक, पाने पोखरणारी अळी यांच्या नियंत्रणासाठी केला जातो. यासाठी ५ किलो कडुनिंबाची पाने, १०० लिटर पाणी, १ किलो देशी शेण आणि ५ लिटर देशी गोमूत्र आवश्यक आहे. हे सर्व एकत्र एका मोठ्या ड्रममध्ये ठेवावे आणि २ ते ३ मिनिटे ढवळत राहावे. आता या ड्रमचे तोंड सुती कापडाने बांधावे, ४८ तास हे झाकूनच ठेवावे. ४८ तासानंतर कीडनियंत्रक नीमस्त्र तयार होईल. एकदा तयार झाल्यानंतर तुम्ही तुमच्या शेतात ६ महिनेपर्यंत हे नीमस्त्र वापरू शकता. त्याचा वापर करण्यासाठी ५ ते ६ लिटर नीमस्त्र २५० लिटर पाण्यात चांगले मिसळून एक हेक्टर शेतात फवारणी करावी.

अग्नीस्त्र : अग्नीस्त्राचा वापर खोड पोखरणारी अळी, फळ पोखरणाऱ्या अळ्या आणि इतर विविध प्रकारच्या अळ्यांच्या नियंत्रणासाठी करतात. यासाठी सुमारे ५ किलो कडुलिंबाची पाने, अर्धा किलो हिरवी मिरची आणि अर्धा किलो लसूण व २० लिटर गोमुत्र लागेल.

या सर्व गोष्टी नीट बारीक करून मिश्रण तयार करायचे आहे. आता या तयार मिश्रणात २० लिटर गोमूत्र मिसळले जाते आणि सुमारे २० मिनिटे उकळले जाते. हे मिश्रण सुमारे ४८ तास ठेवावे आणि त्यानंतर ते सुती कापडाने गाळून ड्रममध्ये ठेवावे. ५ ते ६ लिटर अग्निस्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी.

ब्रह्मास्त्र : ब्रह्मास्त्राचा वापर पिकांमधील पोखरणाऱ्या किडी, कीटक आणि अळ्या यांना नियंत्रित करण्यासाठी करतात. यासाठी ३ किलो कडुनिंबाची पाने, २ किलो करंज, २ किलो सीताफळ, २ किलो धतुऱ्याची पाने आणि १० लिटर गोमूत्र लागेल. हे सर्व एकत्र करून मिश्रण तयार करून २० ते २५ मिनिटे उकळावे. ४८ तासांनंतर, हे मिश्रण थंड होऊ द्यावे आणि सूती कापडातून गाळून घ्यावे. ५ ते ६ लिटर ब्रह्मास्त्र २५० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टर जमिनीवर फवारणीसाठी वापरावे.



# उन्हाळी गवार देते अधिकचा फायदा; अशी करा लागवड

गवार अनेकांच्या पसंतीची भाजी असून, गवारीच्या हिरव्या शेंगांची भाजी खाण्यासाठी वापरली जाते. गवारीपासून डिंक, जनावरांचा हिरवा चारा, हिरवळीची खते म्हणून वापर केला जातो. हे पीक व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. गवारीच्या शेंगांमध्ये अ, व आणि क जीवनसत्त्वे तसेच लोह, फॉस्फरस, प्रथिने, चुना, मुबलक प्रमाणामध्ये आढळतात. गवार खाल्ल्याने पोटाच्या समस्या, त्वचेच्या समस्यासुद्धा दूर होतात. रक्तदाबासह मधुमेहसुद्धा नियंत्रित राहतो.

आवश्यक जमिन : गवार हे पीक कोणत्याही जमिनीमध्ये चांगले येते. मात्र, जास्त उत्पादन घेण्यासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सेंद्रिय पदार्थ जास्त असणारे मध्यम ते भारी जमीन या पिकाच्या वाढीसाठी योग्य ठरते. गवारीची लागवड पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत करू नये, त्यामुळे उत्पन्न कमी येते. हलक्या जमिनीमध्ये शेणखत दिल्यानंतर पीक उत्तम येते.

विविध जाती : सुरती गवार, पुसा नवबहार, पुसा सदाबहार या सुधारित जातींसह देशी वाणाची लागवडही मोठ्या प्रमाणावर केली जाते.

पूर्वमशागत : लागवड करण्याच्या अगोदर निवडलेली जमीन नांगरून घ्यावी आणि त्याचवेळी जमिनीमध्ये जास्त प्रमाणामध्ये शेणखत किंवा घन जीवामृत घालावे. मशागत करताना सर्व ढेकळे फोडून घ्यावे आणि कोळप्याच्या साहाय्याने दोन ते तीन पाळ्या मारून जमीन एकसारखी करून घ्यावी.


लागवड कधी व कशी कराल? गवारीची लागवड ही खरीप किंवा उन्हाळी हंगामामध्ये केली जाते. गवारीची लागवड ही ४५ बाय १५ सेंटीमीटर किंवा ३० बाय १५ सेंटीमीटर या अंतरावर सरीवर केली जाते. सरी वरंब्या वर प्रत्येक ठिकाणी दोन बिया टोकाव्या. बिया टोकण्याच्या अगोदर जर दोन तास पाण्यामध्ये भिजवून ठेवल्या तर उगवण चांगली होते.

पाणी व्यवस्थापन : लागवडीपूर्वी जमिनीला हलके पाणी द्यावे, वापसा आल्यानंतर शक्यतो लागवड करावी. त्यामुळे गवारीची उगवण चांगली होते. लागवडीनंतरही हलके पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर बघून पाण्याचे योग्य नियोजन करावे. फुले आल्यानंतर शेंगांचा बहार पूर्ण होईपर्यंत पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. तणाचा बंदोबस्त करण्यासाठी प्लास्टिक पेपरचे मल्चिंग करावे. कीडरोगाचे योग्य व्यवस्थापन केल्यास चांगले येते.

खत व्यवस्थापन : बियाणे पेरण्यापूर्वी एक किलो बियाण्यास २ ग्रॅम थायरम किंवा ३ ग्रॅम कॅप्टन ही बुरशीनाशके लावावीत. जेणेकरून बियाणे कुजणार नाही. लागवडीवेळी शेणखत मिसळावे. पाण्याची सोय असल्यास फुलोऱ्यात असताना आणि शेंगा धरताना नियमित पाणी द्यावे. लागवडीनंतर एक ते दीड महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते व ६० ते ७० दिवसांत पहिली तोडणी तयार होते. गवारीच्या कोवळ्या शेंगा जातीनुसार ६ ते ७ आठवड्यात तोडणीसाठी येतात.

गवारीचे आरोग्यदायी फायदे : गवारीच्या शेंगा या प्रथिने, फायबर, व्हिटॅमिन अ, ब, क ची भरपूर मात्रा असलेल्या पचनक्रिया सुधारण्यास, वजन नियंत्रित करण्यास, हाडे मजबूत करण्यास मदत करतात. यातील कमी कॅलरीज व उच्च फायबरमुळे मधुमेहींसाठी व हृदयविकाराच्या रुग्णांसाठी ही भाजी अत्यंत फायदेशीर आहे. लोह असल्याने शरीरातील हिमोग्लोबीनची पातळी वाढवते.

काढणी व उत्पादन : गवारीच्या शेंगा गुच्छाने लागतात भाजीसाठी हिरव्या कोवळ्या; परंतु वाढलेल्या शेंगांची नियमित तोडणी केली जाते. तोडणीसाठी उशीर झाल्यास शेंगा जून होतात. त्यासाठी वेळोवेळी तोडणी आवश्यक आहे. बाजारात कोवळ्या शेंगांना मागणी असल्याने ३ ते ४ दिवसांनी तोडणी करावी. शेंगा जाड होण्यापूर्वी तोडणी करावी. प्रत्येक वाणानुसार उत्पादन वेगवेगळे येते सरासरी हेक्टरी पाच ते सहा टन उत्पादन मिळते. गवारीला दरही चांगला मिळतो.



# १२०० सिलेंडरचा घोळ आणि ७ लाखांची अफरातफर

## मानसिक दडपणातून गॅस वितरकाचा आत्महत्येचा प्रयत्न, धाराशिवमध्ये खळबळ

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिवमध्ये गॅस स्टॉक आणि वितरण व्यवस्थेत मोठी तफावत आढळल्याने निर्माण झालेल्या तणावातून ज्ञानेश्वर माळी या गॅस वितरकाने जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कंपनीच्या तपासणीनंतर समोर आलेल्या १२०० सिलेंडरच्या घोळासह सुमारे सात लाख रुपये किमतीच्या सिलेंडरची बेकायदेशीररीत्या विक्री केल्याच्या चर्चेमुळे माळी प्रचंड मानसिक दडपणाखाली होते. सद्यस्थितीत त्यांच्यावर सोलापूरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास पोलिसांनी हाती घेतला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील गॅस वितरक ज्ञानेश्वर माळी यांनी कंपनीच्या तपासणीत साठा आणि वितरण यामध्ये मोठी तफावत आढळल्याने निर्माण झालेल्या मानसिक तणावातून आत्महत्येचा प्रयत्न केला. गेल्या अनेक दिवसांपासून या वितरकाकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याने गॅस कंपनीने त्यांचा पुरवठाही बंद केला होता, ज्यामुळे ते प्रचंड दडपणाखाली होते अशी माहिती समोर आली आहे.





विशेष म्हणजे, सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे धाराशिव जिल्ह्यात गॅस टंचाईची गंभीर समस्या जाणवत असतानाच, गॅस कंपनीच्या बैठकीत डीलरने हे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच तामलवाडी पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, या प्रकरणाचा नेमका उलगडा करण्यासाठी त्यांनी पुढील तपास सुरू केला आहे. नागपूरच्या जरीपटका परिसरात गॅस सिलिंडर वितरणास होणाऱ्या विलंबामुळे संतापलेल्या नागरिकांनी चक्क सिलिंडर पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बराच वेळ रांगेत उभे राहूनही सिलिंडर मिळत नसल्याने संतप्त जमावाने हे टोकाचे पाऊल उचलले होते. मात्र माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आणि समजुतीनंतर नागरिकांनी पळवून नेलेले सिलिंडर पुन्हा एजन्सीकडे सुपूर्द केले असून, या गोंधळामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. बीड जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिक त्रस्त झाले असून, गेवराईसारख्या ग्रामीण भागात गॅस एजन्सी उघडण्यापूर्वीच ग्राहकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. गॅस सिलिंडरचा सर्रास होणारा काळाबाजार आणि ग्राहकांचे ओटीपी परस्पर मिळवून केल्या जाणाऱ्या अवैध विक्रीमुळे ही कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर प्रकारांची दखल घेऊन गॅस वितरणाचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# भावसार समाज इंदोर तर्फे वधू वर मेळावा उत्साहात संपन्न

इंदोर । प्रतिनिधी

भावसार क्षत्रिय समाज, इंदोर यांच्या वतीने प्राम गार्डन येथे आयोजित अखिल भारतीय युवक-युवती वधू-वर परिचय मेळावा आणि समाजबंधू आणि भगिनींच्या उत्साहाने समाज बांधवांच्या ऐक्य, संघटनाची आणि प्रगतीशील वाटचालीचे प्रभावी दर्शन या भव्य आयोजनातून घडले. या मेळाव्यात देशभरातील विविध राज्यांतून आलेल्या भावसार समाजबंधूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सुमारे ८०० हून अधिक नवयुवक-युवतींनी आपली नावे नोंदवून जीवनसाथीच्या शोधासाठी मंच गाठला, तर एकूण ४५०० हून अधिक महिला-पुरुष उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाची व्याप्ती अधोरेखित झाली.

टिकाऊ चाललेल्या परिचय सत्रांमध्ये उमेदवारांनी स्वतःचा शैक्षणिक, कौटुंबिक व वैयक्तिक परिचय करून दिला. पालकांच्यावतीने सुमारे ५० पेक्षा अधिक नातेसंबंधांच्या अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे समजते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ९१५ समाजसेवकांच्या सहभागातून १३ विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली होती. या समित्यांनी निवास, भोजन, नोंदणी, नियोजन व स्वागत अशा विविध स्तरावर आपले योगदान दिले. विशेष म्हणजे महिला कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमाला अधिक व्यापकता प्राप्त झाली.




इंदोर भावसार समाजातर्फे गुलाब भावसार जगदीश भावसार द्वारकादास फटले यांचा सत्कार करताना अध्यक्ष चंद्रकांत मंडवाले,राजेश पारीख

समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत मंडवले यांच्या मार्गदर्शनाखाली, राकेश पारीख, उमंग पारीख,प्रदीप भावसार यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गेल्या सहा महिन्यांपासून केलेल्या अथक परिश्रमाचे हे यश मानले जात आहे. मेळाव्यातील विविध सत्रांच्या बदललेल्या स्वरूपांमुळे या मेळाव्याला व्यापक प्रतिसाद मिळाला. समाजाचे र.न. ३३५४७ चे राष्ट्रीय अध्यक्ष सुधीर नवले, विदर्भ अध्यक्ष अनिल मावळे, जेष्ठ पत्रकार गुलाब भावसार, नंदू लांडे,हनुमंत मिरजकर, द्वारकादास फटाले, जगदीश भावसार मनमोहन भावसार राजस्थान आदी मान्यवर उपस्थित होते.देशभरातील पारंपारिक समाज संस्था चे अध्यक्ष व यासारख्या मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# पावसाच्या पाण्यामुळे सांडपाणी प्रकल्प रखडला

## आठ डबक्यांतून डासांची पैदास, सांडपाणी नदीत येऊन तुंबल्याने कुंडलिका नदी झाली अस्वच्छ



जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील ६० हजार घरांतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी कुंडलिका नदीवर जलशुद्धीकरण प्रकल्प होत आहे. नदी स्वच्छ राहावी. नदीत सांडपाणी वाहू नये यासाठी १०८ कोटींचा हा प्रकल्प आहे. पावसामुळे नदीपात्रात पाणी होते. त्यामुळे हे रखडले आहे, असे अधिकारी म्हणत आहेत. परंतु, आता पाच महिन्यांपासून नदीत पाणी नसतानाही काम अर्धवटच आहे. नदीत जागोजागी पाणी साचले आहे. चंदनझिरा परिसराकडून येणारे पाणीही स्व. बाळासाहेब ठाकरे बंधाऱ्यात साचत आहे.

दोनदा मुदतवाढ घेऊनही काम संथगतीने होत आहे. नदीपात्रात आठ ठिकाणी पाणी साचले आहे. त्यामुळे डास रोखण्यासाठी असलेला हा प्रकल्प डासांची उत्पत्ती करणारा ठरू लागला आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे बंधाऱ्यातही सांडपाणी साचत आहे. या कामाच्या चौकशीची मागणी केल्याची माहिती स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर यांनी दिली. सांडपाणी प्रकल्पाचे काम तातडीने करून घेण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. याबाबत कंत्राटदाराला सूचना दिल्या, अशी माहिती पाणीपुरवठा अभियंता राजेश बगळे यांनी दिली. आयुक्तांकडे केली तक्रार डास चावल्यास मलेरिया, डेंग्यू, तत्सम ताप येऊशकतो. लहान मुलांना यापासून अधिक धोका असतो, अशी माहिती डॉ. सच्चिदानंद तौर यांनी दिली. मनपातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून कंत्राटदाराने ९५ टक्के रक्कम, म्हणजे ९४ कोटी रुपये उचलून घेतले. प्रत्यक्षात बहुतांश काम बाकी असतानाही काम ९० टक्के झाल्याचे दाखवण्यात आले.

**(जाहिर प्रगटन)**

**(मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक, १२६/२०२६**

**अरुण व ईतर विरुध्द निरंक**

**श्रीमती. पी. व्ही. शहाणे**

ज्यापेक्षा लिलाबाई भ्र. अरुण कांकरिया (पतीकडील नाव), लिलाबाई पि. पन्नालाल पगारिया (वडिलाकडील नाव), हे दिनाक ०९/०२/२०२६ रोजी मयत झाले असून खालील अर्जदार है त्याचे वारस आहेत.

१. अरुण पि. सुवालाल कांकरिया,वय ७८ वर्षे, धंदा व्यवसाय,
२. राहुल पि. अरुण कांकरिया, वय ५० वर्षे, धंदा व्यवसाय,
३ अतुल पि. अरुण कांकरिया, वय ४९ वर्षे, धंदा व्यवसाय.
४. जोत्शना भ्र. शांतिलाल जैन, वय ५० वर्षे, बंदा घरकाम,
५. राखी पि. अरुण कांकरिया, वय ४० वर्षे, धंदा घरकाम,

अर्जदार क्र १ ते ५ यांचा पत्ता रा. पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड

ज्याअर्थी, अर्जदार क्र १ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र २ व ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र ४ व ५ हया मयताच्या मुली आहेत या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदाराच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत लिलाबाई भ्र. अरुण कांकरिया (पतीकडील नाव), लिलाबाई पि. पन्नालाल पगारिया (वडिलाकडील नाव), यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.पु.ता.०९/०६/२०२६

**का लिपीक**
स्वाक्षरित
सह दिवाणी न्यायालय क स्तर पाटोदा

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क स्तर पाटोदा

# भोकरदन येथे करून दिली नवनियुक्त पोलिस पाटलांना कर्तव्याची जाणीव

## भोकरदन-जाफराबादच्या १७७ पोलिस पाटलांनी घेतला प्रशिक्षणात सहभाग

भोकरदन । प्रतिनिधी

येथील पंचायत समितीच्या नवीन इमारतीतील सभागृहात पोलिस पाटील पदाची एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा झाली. भोकरदन, जाफराबाद येथील १७७ पोलिस पाटील उपस्थित होते. उपविभाग भोकरदन अंतर्गत भोकरदन, जाफराबाद, हसनाबाद, टेंभुर्णी, पारध पोलीस ठाणे हद्दीतील गावांमधील नव्याने नियुक्त पोलिस पाटील, तसेच जुने कार्यरत पोलिस पाटील यांना कायदेविषयक अधिकार, कर्तव्य यांची माहिती देणे. दैनंदिन कामकाजात सुधारणा करणे. या उद्देशाने पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन झाले.

कार्यशाळेत तीन सत्रांत प्रशिक्षण झाले. डॉ. नितीन कटेकर, उपविभागीय पोलिस अधिकारी, भोकरदन यांनी महाराष्ट्र ग्राम पोलिस अधिनियम, १९६७ मधील तरतुदी सांगितल्या. पोलिस पाटील पदाचा इतिहास मांडला. नेमणूक, कर्तव्य, अधिकार, कामाची कार्यपद्धती समजावली. पोलिस पाटील अभिलेख, प्रतिबंधक उपाययोजना, गुन्हेगार माहिती संकलन, समन्स, वॉरंट, झडती, बेवारस मालमत्ता, निवडणूक, पुतळा, ग्रामरक्षक दल, गावातील गुप्तवार्ता यावर दोन सत्रांत मार्गदर्शन केले. सपोनि आरती जाधव यांनी महिला विषयक जनजागृती केली. पोक्सो कायद्याबाबत माहिती दिली. महिला गुन्ह्यांबाबत पोलिस पाटील यांची जबाबदारी स्पष्ट केली. गुड टच, बॅड टच, भरोसा सेल यावरही मार्गदर्शन केले. पोउपनि योगेश चव्हाण यांनी सायबर सुरक्षा जनजागृती केली. सायबर फ्रॉड, यूपीआय आयडी, फेक अकाउंट, सोशल मीडिया स्कॅम, डिजिटल अरेस्ट, व्हॉट्सअॅप हॅकिंग, लहान मुलांकडे मोबाइल दिल्यास होणारे दुष्परिणाम, एम-कवच सिक्युरिटी सोल्युशन, फेक कॉल याबाबत माहिती दिली. कार्यशाळेला उपविभागीय अधिकारी बी. सरवनन, गटविकास अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, पोनि सतीश जाधव, कैलास भारती, योगेश उबाळे, सागर शिंदे, अंमलदार रामेश्वर सिनकर, प्रशांत उवाळे, सुनील सिंघल आदी उपस्थित होते. मार्गदर्शिका पुस्तकाचे वाटप पोलिस पाटलांना जालना जिल्हा पोलीस दलातर्फे तयार करण्यात आलेली पोलिस पाटील मार्गदर्शिका या पुस्तकाचे तर महसूल विभागातर्फे ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. भोकरदन उपविभागामध्ये गंभीर गुन्ह्यासाठी फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध झालेली आहे. फॉरेन्सिक टीम ने देखील पोलीस पाटील यांना सदर वाहनाचा उपयोग, साहित्य यांचा परीचय करुन देवून खून व पोक्सो या गुन्ह्यांचा क्राईम सीन केला. फॉरेन्सिक किटचे प्रशिक्षण दिले.

# दर्शनासाठी भाविकांची गर्दी; अनोख्या परंपरेचे जतन

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातून संत बाळू मामांची पालखी मार्गस्थ झाली आहे. पालखीतील मेंढ्यांचा मोठा कळप मंगळवारी घनसावंगी येथे मुक्कामी आहे. या अनोख्या परंपरेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. हजारो मेंढ्या असूनही कळपाचा मालक कोणीच नाही. मेंढ्यांची देखभाल करणारे चालक आहेत. मालक नसल्याची परंपरा आजही कायम आहे. संपत्तीला मालक असतो, हा सर्वसाधारण नियम येथे अपवाद ठरत आहे.

भक्तांच्या श्रद्धेनुसार, संत बाळू मामा सगुण रूपातून अदृश्य होण्यापूर्वी त्यांनी मेंढ्या, शेळ्या, घोडे व इतर संपत्ती कोणालाही वारसा म्हणून दिली नाही. जमल्यास सांभाळ करा. समाजाला अन्न-पाणी व भक्तीचा लाभ द्या. अन्यथा सर्व डोंगरात सोडून द्या. अशी त्यांची आज्ञा असल्याचे भक्त सांगतात. याच परंपरेतून मेंढ्यांचे कळप बाळू मामांच्या पालखीसह महाराष्ट्रासह देशभर भ्रमंती करत आहेत. सध्या अशा अनेक पालख्या आहेत. प्रत्येक पालखीत साधारण २ हजार ते २ हजार ५०० हून अधिक मेंढ्या असतात. या व्यवस्थेचे प्रमुख कारभारी म्हणून गायके काम पाहत आहेत. घनसावंगी तालुक्यात ज्या गावांत कळप मुक्कामी असतो, तेथील गावकरीच मेंढ्यांची सेवा करतात. अन्न-पाण्याची जबाबदारी उचलतात. साधारण ७ ते ८ दिवसांनी कळप पुढील ठिकाणी प्रस्थान करतो. दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येत आहेत. परिसरात भक्तिमय वातावरण आहे. सकाळ-संध्याकाळ बाळू मामांच्या मूर्तीची आरती होते. आरतीला हजारो भाविक उपस्थित राहतात. आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# संत बसवेश्वर महाराजांच्या जयंतीदिनी लिंगायत समाज मागणीनुसार नामफलकाची पुनर्स्थापना करण्याची मागणी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी शहरातील कै.वसंतराव नाईक पुतळा ते उपजिल्हा रुग्णालय या मार्गाला ''महात्मा बसवेश्वर मार्ग'' बाबतचा फलक आकर्षक पद्धतीने लावावा अशी मागणी पाथर्डी तालुका वीरशैव लिंगायत समाजाचे वतीने पाथर्डी नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे व नगरअध्यक्ष अभय आव्हाड यांच्याकडे निवेदन देत करण्यात आली याबाबत अधिक माहिती देताना लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी सांगितले की सुमारे दहा वर्षांपूर्वी तालुक्यातील समस्त वीरशैव लिंगायत समाजाचे वतीने मागणी केल्यानुसार नगरपरिषदचे वतीने ठराव घेऊन तत्कालीन मुख्याधिकारी वसुधा कुरणावळ यांचे हस्ते स्व. वसंतराव नाईक पुतळा ते उपजिल्हा रुग्णालय या मार्गाचे ''महात्मा बसवेश्वर मार्ग'' असे नामकरण करण्यात आले होते नगरपरिषदेच्या वतीने स्व.वसंतराव नाईक पुतळा येथे त्याबाबतचा आकर्षक मार्गफलक ही लावण्यात आलेला होता परंतु राष्ट्रीय महामार्गच्या वतीने स्व.वसंतराव नाईक चौकात रुंदीकरणाचे काम चालु असताना हा नामफलक काढण्यात आला येत्या अक्षयतृतीयेला थोर समाज सुधारक महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती नगरपरिषद कार्यालयासह सर्व स्तरावर शासकीय इतमामात साजरी केली जाते याच दिवशी समस्त वीरशैव लिंगायत समाज बांधवांची आस्था असलेल्या तथा समस्त मानवजातीला समतेचा संदेश देणाऱ्या या महापुरुषाचा वरील मार्गाला असलेला मार्गफलक हा ग्रॅनाईट मार्बल मध्ये व आकर्षक रीतीने बनवून पुनर्स्थापित करण्यात यावा अशी मागणी सकल लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीचे वतीने करण्यात आली आहे यावेळी लिंगायत संघर्ष समितीचे शहर अध्यक्ष सुहास शेळगावकर तालुकाध्यक्ष सचिन फुटाणे समितीच्या महिला तालुकाध्यक्ष .रेणुका फुलशेटे खरेदी विक्री संघाचे संचालक पुरुषोत्तम इजारे सामाजिक कार्यकर्ते अभिजित गुजर गजानन तारापुरे संतोष बुरसे सेवानिवृत्त पालिका कर्मचारी सुरेश इजारे ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताभाऊ इजारे आदी उपस्थित होते.



# शेंद्रा येथे मांगीरबाबा यात्रेमध्ये तीन लाख भाविकांची हजेरी

## ढोल-ताशांच्या गजरात, रेवड्यांची उधळण करत आणि पारंपरिक वेशभूषेत भक्तांनी घेतले दर्शन

करमाड । प्रतिनिधी

महाराष्ट्रासह इतर राज्यांतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शेंद्रा कमंगर येथे दरवर्षीप्रमाणे भरवण्यात येणाऱ्या मांगीरबाबा यात्रेला भक्तिभावाच्या वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. रविवारी मध्यरात्री यात्रेची सुरुवात होताच परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून दुसऱ्याच दिवशी मंगळवारी (७ एप्रिल) हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. जवळपास अडीच ते तीन लाख भाविकांनी हजेरी लावली. कडक उन्हाची पर्वा न करता 'मांगीरबाबा की जय'च्या जयघोषात भाविकांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. पहाटेपासूनच नवस फेडण्यासाठी आलेले महिला-पुरुष अनवाणी पायाने मंदिराकडे जाताना दिसून आले.



ढोल-ताशांच्या गजरात, रेवड्यांची उधळण करत आणि पारंपरिक वेशभूषेत भक्तांनी दर्शन घेतले. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. प्रशासनाचा चोख बंदोबस्त यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ग्रामपंचायत, देवस्थान समिती आणि पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी पूजा नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली चिकलठाणा पोलिस निरीक्षक रविकिरण दरवडे यांच्यासह करमाड पोलिस व वाहतूक शाखेच्या पथकाने कडेकोट व्यवस्था केली आहे. वाढत्या उन्हाचा फटका; तरीही भक्तांची होती उपस्थिती भाविकांनी दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणावर नवस फेडले : यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणावर नवस फेडण्याची परंपरा पार पडली. मंगळवारी ९५० बोकड आणि ४१८ कोंबड्यांचा बळी देऊन भाविकांनी आपला नवस फेडला. २०१९ या वर्षापासून बंद करण्यात आलेली गळटोचणी प्रथा यंदाही पूर्णपणे बंद राहिली असली तरी बोकड व कोंबड्यांच्या बळीची परंपरा मात्र कायम असल्याचे दिसून आले. १९९९ नंतर शेंद्रा एमआयडीसीमुळे परिसरात झपाट्याने शहरीकरण झाले आहे. यामुळे पूर्वी असलेली झाडांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असून सावलीअभावी भाविकांना उन्हात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नवस फेडण्यासाठी मोकळी जागा कमी पडत असल्याने भाविकांना दूरवर जावे लागत असल्याचे चित्र आहे. या वर्षी वाढत्या तापमानाचा काही प्रमाणात परिणाम भाविकांच्या संख्येवर झाल्याचे चित्र दिसले. सोमवारी उन्हाच्या तीव्रतेमुळे तुलनेने कमी गर्दी होती. मात्र मंगळवारी भाविकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली. महाराष्ट्रासह इतर राज्यांतून आलेल्या भाविकांनी सकाळपासून दर्शनासाठी रांगा लावल्या. कपाळावर मळवट, हातात कट्यार आणि मुखी बाबांचा जयघोष करत अनेक भाविक जालना महामार्गापासून अर्धा किलोमीटर अंतर चालत मंदिरात पोहोचले. कडक उन्हापासून बचावासाठी काहींनी झाडांचा आसरा घेतला, तर सामाजिक संस्थांकडून शिरा, खिचडीचे वाटप करण्यात आले.

# दबाव गट निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय बंजारा महासंघाची स्थापना - प्रा.पी.टी. चव्हाण

बीड । प्रतिनिधी

देशाला स्वातंत्र्य मिळून ऐंशी वर्षे होत आली तरी महाराष्ट्र आणि देशातील बंजारा समाजाला सामाजिक शैक्षणिक आर्थिक व राजकीय न्याय मिळालेला नाही, ही बंजारा समाजावर प्रचंड अन्याय करणारी गोष्ट असून अनेक प्रश्न बंजारा समाजाला भेडसावत आहे,अशा प्रलंबित व जिव्हाळ्याच्या शेकडो प्रश्नांना प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व सरकार दरबारी या समस्या मांडण्यासाठी व बंजारा समाजाला मान सन्मान व सत्तेतील वाटा मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरून टोकाचं संघर्ष करण्यासाठी बंजारा समाजासमोर एक सक्षम पर्याय म्हणून राष्ट्रीय बंजारा महासंघाची स्थापना आज




विश्व गोर बंजारा दिनाच्या शुभ दिनी करण्यात येत आहे.

– जगण्यासाठी मरण यातना भोगणारा बंजारा समाज, पोटाची खळगी भरण्यासाठी जंगल दरी खोऱ्यात भटकंती करणारा,सहा महिने कारखान्याच्या उसाच्या फडात प्रचंड मेहनत करणारा परंतु पदरी कायम निराशा निराशा आलेला बंजारा समाज अनेक अर्थाने दाबला गेला, हक्क व न्याया पासून दुर्लक्षित व वंचित राहिला आहे.बंजारा समाजाचा व्यथा व वेदना सरकारला माहित नाही,म्हणून अनेक क्षेत्रात बंजारा समाजाची पिछेहाट होत आहे.सामाजिक शैक्षणिक आर्थिक राजकीय क्षेत्रात बंजारा समाजाला नगण्य वाटा मिळाला त्यामुळे या समाजाचा विकास होऊ शकला नाही. तांडे विकास पासून कोसो दूर आहेत. समाजात शिक्षणाचे अल्प प्रमाण असल्यामुळे नोकरीचे प्रमाण देखील कमीच आहे, सत्तेत राजकीय भागीदारी न मिळाल्यामुळे बंजारा समाजाचे प्रश्न सभागृहात मांडले गेले नाही.त्यामुळे सरकारने अर्थसंकल्पात बंजारा समाजाच्या विकासासाठी कसलीही तरतूद केली नाही.अशा अनेक भेडसावणाऱ्या गोष्टी आम्हाला अस्वस्थ करत आहेत.या समस्याचे समाधान शोधण्यासाठी व राज्य तथा देशातील बंजारा समाजाला संघटित करून आपल्या न्याय हक्कासाठी पान ३ वर

# आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत शिवसेना जिल्हा आढावा बैठक!



## पदाधिकारी-शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- जगताप, मुळूक, गलधर, नवले

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना.श्री. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब तसेच शिवसेना सचिव श्री.संजयजी मोरे साहेब यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख मा.ना.श्री. प्रकाशजी अबिटकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव श्री अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख श्री. मनोजजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ९ एप्रिल २०२६ दु. १:३० वाजता

बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड येथे शिवसेना जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी जिल्हा आढावा बैठकीत बीड जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच आगामी राजकीय रणनीती, संघटन विस्तार आणि विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असून काही महत्त्वाचे निर्णयही घेतले जाणार आहेत. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक आणि बूथ प्रमुखांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर आणि जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी केले आहे.



बीड : दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ,एड.सतीश शिंदे ,दादा मेहेत्रे, दैनिक नवराष्ट्र चे ब्युरो चीफ रवी उबाळे, संजय शिंदे, आदी उपस्थित होते.

# समाजातील शेवटच्या घटकाला संघटन सृजन अभियान न्याय देईल -नीतू वर्मा सोईन

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यभारत पक्षीय संगघटनात्मक बदल फेरबदल करण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे व विरोधीपक्ष नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संघटन सृजन अभियान सुरु असून,शहरातील शासकीय विश्रामगृह येथे सदरील कार्यक्रम कार्यकर्त्यांच्या उत्सपूर्द प्रतिसादात अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात संपन्न झाला.

यावेळी संघटन सृजन अभियान या



कार्यक्रमासाठी दिल्लीहुन मुख्यनिरीक्षक श्रीमती नीतू वर्मा सोईन सह माजी आमदार एम एम शेख,संघटन निरीक्षक सुरेंद्र खोडजकर, प्रदेश समन्वयक सौ विद्याताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.


यावेळी मुख्यनिरीक्षक नीतू वर्मा सोईन यांनी उपस्थित कार्यकर्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकाला पक्षाचे संघटन सृजन अभियान न्याय देत सर्व स्तरातील लोकांना पक्ष संघटनेत सामावून घेऊन पक्ष मजबूत करू, तसेच यावेळी प्रत्येक कार्यकर्त्यांचं वैयक्तिक म्हणणं ऐकून सामान्य कार्यकर्त्यांचं पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मत घेतले.सदरील कार्यक्रमास तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे,जिल्हाउपाध्यक्ष महावीर मस्के,वरिष्ठ जिल्हाउपाध्यक्ष प्रवीण शेफ, वरिष्ठ नेते बाळासाहेब ठोंबरे, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,शेख अहेमद, कल्याण भारस्कर, सिद्धार्थ घडसे, अशोक कांबळे, हरिभाऊ चाळक, सतीश चाळक, जाणू शहा, हनुमान थोरात, संकेत कासार,अक्षय थोरात, दिपक क्षीरसागर, कृष्णा शिंदे, करामा चाऊस, फारुख शेख,किशोर कांबळे, सुधाकर कांबळे,असद पान ३ वर

# पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

## पोलीस कर्मचाऱ्याने गळफास घेऊन जीवन संपवल्याने खळबळ

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०८ एप्रिल बुधवार रोजी बीड शहरातील नगर रोड परिसरात धक्कादायक घटना उघडकीस आली असून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी बाळकृष्ण जायेभाय (वय ४२) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे



ही घटना नगर रोडवरील समर्थ मंगल कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या लोकाशा नगर परिसरात घडली. बाळकृष्ण जायभाय हे सध्या माजलगाव शहर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांनी आत्महत्या का केली यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

पोलीस दलामध्ये कर्तव्यदक्ष,मनमिळावू म्हणून व सर्वांशी प्रेमाने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून जायभाय ओळखले जात होते. जायभाय हे बीड स्थानिक गुन्हे शाखा तसेच गेवराई पोलीस ठाण्यात कर्तव्य बजावले होते यामुळे ते बीड जिल्ह्यात सर्वतो परिचित होते. त्यांच्या अशा अचानक जाण्यामुळे पोलीस दलात व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करत आहेत.

# भरधाव ट्रकच्या धडकेत दीनदयाळ बँकेचे अधिकारी सुदर्शन टाक यांचा जागीच मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील रिंग रोडवरील मानवलोक कार्यालयाजवळ दि.०८ एप्रिल बुधवार रोजी सकाळी झालेल्या भीषण अपघातात दीनदयाळ बँकेचे वरिष्ठ अधिकारी सुदर्शन टाक (वय ४५) यांचा जागीच मृत्यू झाला. टाक हे आपल्या दुचाकीवरून बँकेत नेहमीप्रमाणे आपल्या स्कूटीवरून कामासाठी निघाले होते. रिंग रोडवरून येतअसताना मानवलोक कार्यालया जवळ एका भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली.गंभीर मार लागल्याने टाक यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहंचुन तातडीने घटनेचा पंचनामा केला.पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली या अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.



अपघाताचे वृत्त समजताच दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड. मकरंद पत्की,इतर संचालक,मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने रुग्णालयात आणि घटनास्थळी धाव घेत या संपूर्ण घटनेची माहिती घेतली.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.सायंकाळी त्यांच्या मूळगावी उजनी येथे त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वाढदिवसाला बोलावले नाही म्हणून एकाकी पडलेल्या २४ वर्षीय तरुणाची आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मित्रांनी वाढदिवसाच्या सेलिब्रेशनला बोलावले नसल्याच्या कारणातून आलेल्या तीव्र नैराश्यातून अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथील २४ वर्षीय महेश उद्धव भणगे या तरुणाने विष प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवली. मंगळवारी दुपारी राहत्या घराच्या छतावर त्याने विषारी द्रव्य प्राशन केले, रात्री ८ वाजेच्या सुमारास तो बेशुद्ध आढळल्यानंतर त्याला तातडीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



महेशचे काही दिवसांपूर्वी मित्रांसोबत वाद झाले होते, ज्यामुळे सोमवारी झालेल्या एका जवळच्या मित्राच्या वाढदिवसाला त्याला निमंत्रित करण्यात आले नव्हते. नेहमी मित्रकार्यात पुढाकार घेणाऱ्या महेशला या उपेक्षेमुळे प्रचंड मानसिक वेदना झाल्या होत्या. आत्महत्येपूर्वी त्याने आपल्या मोबाईलवर माझं दुःख कोणाला सांगू, मी एकटा पडलो असे हृदयद्रावक स्टेटस ठेवून आपली व्यथा मांडली होती. वडिलांनी हट्टापायी शेती विकून त्याला कपड्याचे दुकान टाकून दिले होते, मात्र ऐन उमेदीच्या वयात त्याने घेतलेल्या या टोकाच्या निर्णयामुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. अंबाजोगाई ग्रामीण पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# केजमध्ये तलाठी तर परळीत ग्रामसेवक लाच घेताना पकडला

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने () बुधवारी मोठी कारवाई करत भ्रष्टाचाराविरुद्ध जोरदार संदेश दिला. एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये तलाठी आणि ग्रामसेवकाला रंगेहाथ अटक करण्यात आली. या कारवाईमुळे महसूल व ग्रामविकास प्रशासनात खळबळ उडाली आहे.

केज तालुक्यातील दहिफळ (वडमाऊली) येथे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) परमेश्वर अभिमान जाधव (वय ४७) याला ९ हजार रुपयांची लाच घेताना लातूर उत्पदखात्याच्या पथकाने पकडले .

तक्रारदाराच्या वारस नोंदी सातबाऱ्यावर करण्यासाठी जाधवने ३५ हजार रुपयांची मागणी केली होती त्यापैकी ९ हजार रुपये आगाऊ घेताना तो रंगेहाथ सापडला उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यावर घेण्याचे ठरले होते विशेष बाब म्हणजे, जाधव हा माजी सैनिक असून फक्त ६ महिन्यांपूर्वीच सेवेत रुजू झाला होता ही कारवाई उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या पथकाने केली. दुसरी कारवाई परळी तालुक्यातील जिरेवाडी येथे ग्रामसेवक दशरथ देविदासराव गोरे याला ५०० रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले. विहीर बांधकामाच्या बिलावर सही करण्यासाठी १,००० रुपयांची मागणी केली होती.पंचायत समिती परिसरात मागणी करुन आपल्या खासगी कार्यालयात ५०० रु लाच स्वीकारली. पोलीस निरीक्षक कवडे आणि त्यांच्या पथकाने कारवाई करत गोरेला पकडले ही कारवाई लास्ट लोकल प्रतिबंधक खात्याच्या पथकाने केली या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे एकाच दिवशी दोन ठिकाणी कारवाई ही बहुदा पहिलीच घटना असेल.या दोन कारवायांमुळे जिल्ह्यातील महसूल आणि ग्रामविकास विभागातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

# अल्पवयीन मुलीवर बाललैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीस नियमित जामीन मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील एका गावातील पीडिता दि.१५ मार्च रोजी रात्री ९ वाजण्याचे सुमारास बाथरूमसाठी घराच्या पुढे असलेल्या तळ्याकडे बाथरूमला गेली तेथे पीडितेच्या घराचे समोर राहणारा आरोपी हा आला व पीडितेला म्हणाला की,तू मला आवडतेस तू माझ्यासोबत पळून चल असे म्हणून पीडितेसोबत अत्याचार केल्याची तक्रार पीडितीने माजलगाव ग्रामीण पोलिस स्टेशन येथे दाखल केल्यानंतर गु.र.नं. १२१/२०२५ कलम ६४(१),२३८, ३५१(२)(३) भारतीय न्यायसंहिता २०२३ सह कलम ४, ६, बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ नुसार गुन्हा दाखल झाला.



सदर गुन्ह्यात पोलिसांनी आरोपीस पुणे येथून दि.१९ /२/२०२६रोजी ताब्यात घेतले व आरोपीस मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय माजलगाव यांच्या समक्ष हजर केले असता माननीय न्यायालयाने एका दिवसाची पोलीस कोठडी सुनवली होती.आरोपीने ड.चेतन सातपुते यांच्या मार्फत मा.न्यायालयात जामीन अर्ज दाखल करण्यात आला सुनावणी दरम्यान कथित घटनेचा कालावधी,तक्रार नोंदविण्यात झालेला विलंब,तपासाची सद्धस्थिती तसेच कायद्याच्या सखोल संदर्भ देत न्यायालयासमोर प्रभावी युक्तिवाद केला.सर्व बाबींचा विचार करून मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने आारोपीचा नियमित जमीन अर्ज मंजुर केला.याप्रकरणी ड.चेतन सातपुते यांना विशेष सहकार्य ड.वैभव सोळंके व अर्जुन शिंदे यांनी केले.

# महागाईच्या पार्श्वभूमीवर निराधारांना दरमहा २५०० रुपये द्या : भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

संजय गांधी निराधार तसेच श्रावण बाळ योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या वृद्धांना सध्या मिळणारे १५०० रुपये मानधन अत्यंत अपुरे असल्याने ते वाढवून दरमहा २५०० रुपये करण्यात यावे, अशी मागणी निराधार संघटनेचे अध्यक्ष भाई गंगाभीषण थावरे यांनी केली आहे. वाढत्या महागाईमुळे सध्याचे मानधन दैनंदिन गरजाही भागविण्यास अपुरे पडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

थावरे म्हणाले की, तालुक्याच्या ठिकाणी मानधन घेण्यासाठी जाणाऱ्या लाभधारकांना एस.टी. प्रवासासाठीच १०० ते १५० रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे मिळणाऱ्या रकमेचा मोठा भाग प्रवासातच खर्च होतो. अशा परिस्थितीत उर्वरित रक्कमेत जगणे अत्यंत कठीण होत आहे. महागाईचा विचार करून शासनाने या योजनेतील लाभधारकांबाबत सहानुभूतीची भूमिका घ्यावी आणि तातडीने मानधनवाढीचा निर्णय घ्यावा, शितावरून भाताची परीक्षा होते असे सांगत भाई थावरे यांनी सध्याच्या परिस्थितीची गंभीरता अधोरेखित केली. दरम्यान, या मागणीसाठी लवकरच बीड जिल्ह्यात निराधार परिषद आयोजित करण्यात येणार असून, आवश्यक असल्यास कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन आणि मोर्चा काढण्याचा इशाराही थावरे यांनी दिला आहे. तसेच हा प्रस्ताव मंत्रिमंडळ व विधानसभेत मांडावा, अशी मागणी भाई थावरे यांनी केली आहे.

# शेख रूक्सार युनुसची पोलिस दलात भरारी सामाजिक चळवळीतील सहकाऱ्यांकडून गौरव

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत बीड तालुक्यातील च-हाटा येथील सामाजिक चळवळीतील सहकारी शेख युनुस च-हाटकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस हिची पुणे शहर पोलिस दलात निवड झाल्याबद्दल बीड येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी (दि.०८) सामाजिक चळवळीतील सहका-यांच्या वतीने सहकुटुंब तिचा व कुटुंबियांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

बीड शहराजवळील च-हाटा गावातील सर्वसामान्य कुटुंबातील रूक्सार हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि



कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. शारीरिक तंदुरुस्ती, नियमित अभ्यास तसेच लेखी परीक्षेची काटेकोर तयारी करत तिने पोलीस भरती प्रक्रियेतील सर्व टप्प्यांवर यशस्वीपणे मात केली. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी यश – डॉ. गणेश ढवळे पान ३ वर

# डॉ.अमोल नागरगोजे यांची एमपीएससी मार्फत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट 'अ' मध्ये निवड!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बनकरंजा गावचे भुमीपुत्र डॉ अमोल नागरगोजे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागात सहयोगी प्राध्यापक 'महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ' मध्ये नुकतीच निवड झाली आहे. या निवडीमुळे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या शासकीय विज्ञान संस्थांमध्ये व उच्च शिक्षण विभागात विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या वर त्यांना काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे. डॉ अमोल नागरगोजे हे रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या के एम सी महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागात गेल्या १४ वर्षांपासून सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ अमोल नागरगोजे यांनी पदवी, पदव्युत्तर पदवी व पीएचडी चे शिक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) येथे पूर्ण केले आहे. तसेच, जुन २०११ मध्ये झालेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) मध्ये रसायनशास्त्र विषयात संपूर्ण भारतात ५३ रँक मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. डॉ अमोल नागरगोजे यांनी आजपर्यंत वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये २५ च्या वर शोधनिबंध प्रकाशित केले असून ०४ भारतीय पेटंट देखील मिळवले आहेत. त्यांनी ०३ पुस्तके देखील लिहिले असून जवळपास १० च्या वर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन सादरीकरण केले आहे. भारत सरकारच्या नामांकित 'भारतीय विज्ञान अकादमी' तर्फे त्यांना 'समर रिसर्च फेलोशीप २०२४' देखील प्राप्त झालेली आहे. डॉ अमोल नागरगोजे हे मुंबई विद्यापीठात रसायनशास्त्र विषयात मान्यताप्राप्त पीएचडी गाईड असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ संशोधक विद्यार्थी पीएचडी करत आहे. अध्यापन, संशोधन व शैक्षणिक प्रशासन यांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉ अमोल नागरगोजे यांच्या महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागात झालेल्या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जमीन, गाड्यांचा ताफा शरद पवारांपेक्षा सुनेत्रा पवार

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या असून काँग्रेसने उमेदवार दिल्याने या निवडणुकीत रंगत निर्माण झाली आहे. सोमवारी सुनेत्रा पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या उमेदवारी अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रामुळे सुनेत्रा पवार यांच्या संपत्तीबाबत मोठा खुलासा झाला आहे. सुनेत्रा पवार या सासरे शरद पवार यांच्यापेक्षा श्रीमंत असल्याचे समोर आले आहे.

राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी पुन्हा एकदा राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. दुसरीकडे सुनेत्रा पवार या बारामती विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. शरद पवार आणि सुनेत्रा पवार यांच्या प्रतिज्ञापत्रातून त्यांच्या संपत्तीबाबत मोठा खुलासा झाला आहे. बारामतीच्या



सुनबाई सुनेत्रा पवार यांच्याकडे सासरे शरद पवार यांच्यापेक्षा अधिक संपत्ती आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, सुनेत्रा पवार यांच्याकडे एकत्रितपणे सुमारे १२१. ७९ कोटी इतकी संपत्ती आहे. सुनेत्रा पवार यांच्या संपत्तीमध्ये जमिनीत सर्वाधिक गुंतवणूक केल्याचे दिसून येते. सुनेत्रा पवार यांच्याकडे ६७.६७ कोटींची स्थावर मालमत्ता आहे ज्यामध्ये बारामतीमधील शेतजमीन तसेच व्यावसायिक इमारतींचा समावेश आहे. त्यासोबतच त्यांच्याकडे टोयोटा कॅमरी, इनोव्हा सारख्या आलिशान गाड्या तसेच ५.६ ट्रेलर, ट्रॅक्टर आहेत. त्यांच्या जंगम मालमत्तेचे मूल्य २३. २५ कोटी इतके आहे. दुसरीकडे, शरद पवार यांच्याकडे एकूण ६१ कोटींची संपत्ती आहे. आपल्या संपत्तीत शरद पवार यांनी सर्वाधिक गुंतवणूक ही श शेअर्स आणि मुदत ठेवीत जास्त केली असल्याचे दिसून आले आहे. शरद पवार यांच्याकडे ४४.७१ कोटी रुपयांची एकूण 'जंगम' मालमत्ता आहे. त्याचबरोबर पत्नी प्रतिभा यांच्या नावे २७.७७ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. पवारांवर ४९ लाखांचे कर्ज आहे.


दरम्यान, संपूर्ण पवार फॅमिलीत सुप्रिया सुळेंकडे सर्वाधिक संपत्ती असल्याचे दिसून येते. सुप्रिया सुळेंकडे १६७ कोटींची संपत्ती आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांचे पती सदानंद सुळे हे अब्जाधीश असून, त्यांच्याकडे एकूण १६६.५ कोटी रुपयांहून अधिकची संपत्ती आहे.

# सेक्स रॅकेटमध्ये अडकविण्याची धमकी; पैसे उकळले, वाघोली पोलिस ठाण्यातील ३ पोलिसांचे निलंबन

पुणे । प्रतिनिधी

उच्चशिक्षित तरुण तरुणीला सेक्स रॅकेटमध्ये अडकविण्याची धमकी देत तरुणाला मारहाण करून, वाघोली पोलीस ठाण्यातील तिघा पोलिसांनी दहा हजार रुपये उकळण्याचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान, हा प्रकार पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कानावर येताच त्यांनी या तिघा पोलिसांचे तडकाफडकी निलंबन केले आहे. पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

पोलिस हवालदार किरण अब्दागिरे, गणेश खाडे आणि किरण कांबळे अशी निलंबित करण्यात आलेल्या



पोलिसांची नावे आहेत. हे तिघे पोलिस बीट मार्शल त्या दिवशी कर्तव्यावर होते. नियंत्रण कक्षाला कॉल मिळाल्यानंतर हे तरुण तरुणीला राहत असलेल्या ठिकाणे गेले. त्यानंतर त्यांना पोलिस ठाण्यात आणून धमकावत दहा हजार रुपये एका गॅरेज चालकाच्या खात्यावर घेतले. तसेच त्या तरुणीला देखील ताटकळत पोलिस ठाण्यात उभे ठेवले. दरम्यान, जर काही गैरप्रकार होता तर त्यांच्यावर संबंधित पोलिसांनी कायदेशीर कारवाई करणे अपेक्षीत होते. मात्र त्यांनी असे न करता पैसे उकळण्याचा उद्देशाने त्यांनी असे केले. त्यामुळे तिघांच्या या वर्तनामुळे पोलिस खात्याची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत तिघांचे निलंबन करण्यात आले आहे.

# पुण्यात दुचाकी चोर जेरबंद; चार गाड्या जप्त

घोडेगाव: पुणे जिल्ह्याच्या उत्तर भागात धुमाकूळ घालणाऱ्या एका सराईत दुचाकी चोराला स्थानिक गुन्हे शाखा आणि घोडेगाव पोलिसांनी जेरबंद केले आहे. आरोपीकडून चार दुचाकी आणि एक मोबाईल असा एकूण १ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. राहुल अशोक दाते (वय २५, रा. मंचर) असे या आरोपीचे नाव आहे. मंचर,



घोडेगाव, नारायणगाव आणि ओतूर परिसरात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती. तपास पथकाने घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, सर्व चोरीच्या ठिकाणी एकच व्यक्ती संशयास्पद रित्या वावरताना दिसून आली.

गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार अक्षय नवले यांनासीसीटीव्हीतील चोरटा राहुल दाते असल्याची माहिती मिळाली. तो चोरीच्या गाड्या घोडेगाव येथील नारोडी फाटा येथे विक्रिसाठी येणार असल्याची माहिती मिळली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने घोडेगाव, मंचर, नारायणगाव, ओतूर परिसरातील दुचाकी चोरीची कबुली दिली. आरोपीला पुढील तपासासाठी घोडेगाव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या टोळीत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा अधिक तपास सुरू आहे.

# पुण्यात मद्यधुंद चालकाचा थरार; वाहनांना धडक देत पोलिसाचे अपहरण करण्याचा प्रयत्न

पुणे: वारजे परिसरात मद्यधुंद कारचालकाने भरधाव गाडी चालवत चार ते पाच वाहनांना धडक दिली. दरम्यान, हा प्रकार निदर्शनास येताच त्याला रोखण्यासाठी गेलेल्या एका वाहतूक पोलिसाच्या अपहरणाचा प्रयत्न केला. याप्रकरणी कारचालकाला वारजे पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. संजोग सुरेश माने (वय ३०) असे कारचालकाचे नाव आहे. संबंधित चालक हा मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी उत्तमनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर हे न्यायालयीन कामकाजासाठी शिवाजीनगर येथे जात होते. यावेळी खासगी प्रवासी वाहतूक करणारी एक कार शिवणेवरून वारजे माळवाडीकडे भरधाव निघाली होती. या कारने मार्गात काही वाहनांना धडक दिली आणि पुढे निघून गेली असल्याचे त्यांना समजले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन क्षीरसागर यांनी तत्काळ संबंधित कारचा पाठलाग सुरू केला. वारजे चौका जवळ मद्यधुंद कारचालकाने एका टेम्पोला धडक देत नुकसान केले. यावेळी क्षीरसागर यांनी धाडसाने या कारला ओव्हरटेक करत थांबविले. तेथे जवळ असणाऱ्या वारजे माळवाडी वाहतूक शाखेचे दोन कर्मचारी यांना आवाज देऊन मद्यधुंद कारचालकाला पोलीस चौकीत घेऊन जाण्याची सूचना दिली. मात्र, वाहतूक पोलिस कर्मचारी कारमध्ये बसल्यानंतर चालकाने अचानक कार वेगाने पुढे चालवत पोलिस चौकीकडे न जाता बेधडकपणे वाहन चालवण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही क्षणांसाठी संबंधित पोलिस कर्मचाऱ्याच्या जिवाला धोका निर्माण झाला होता. यानंतर पुन्हा क्षीरसागर यांनी पाठलाग करून संबंधित चालकाला रस्त्यात अडविले आणि रस्त्यात चांगलाच चोप दिला. याबाबत पोलिस कर्मचारी अमोल पिसाळ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार माने याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हडपसरमध्ये ७५ वर्षांच्या आजोबांना १२.३१ कोटींचा गंडा

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील हडपसर भागात सायबर फसवणुकीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखवत सायबर चोरट्यांनी ७५ वर्षीय निवृत्त व्यावसायिकाला तब्बल १२ कोटी ३१ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

तक्रारदारांना जानेवारी महिन्यात एका अनोळखी नंबरवरून शेअर बाजारात गुंतवणूक करा आणि मोठा परतावा मिळवा असा मेसेज आला. अधिक नफ्याच्या आशेने त्यांनी संवाद सुरू ठेवला आणि हळूहळू ते सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकले. यानंतर आरोपींनी त्यांना तखझ डींलज्ञ २४ नावाच्या व्हॉट्सप ग्रुपमध्ये जोडले. या ग्रुपमध्ये विविध गुंतवणूक योजना सांगून आणि बनावट आकडे दाखवून त्यांचा पूर्ण विश्वास संपादन करण्यात आला. चोरट्यांनी वयोवृद्ध व्यावसायिकाला अवघ्या ११ दिवसांत ५४ कोटी रुपयांचा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या आश्वासनाला बळी पडत तक्रारदाराने पुढील तीन महिन्यांत वेगवेगळ्या वेळेस ८ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे ट्रान्स्फर केले. या काळात एकूण १२ कोटी ३१ लाख रुपये लुबाडण्यात आले. कोट्यवधी रुपये उकळले पण प्रत्यक्षात कोणताही परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचं लक्षात येताच संबंधित व्यावसायिकाने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.अलिकडच्या काळात ज्येष्ठ नागरिकांसह तरुणांनाही लक्ष्य करत सायबर गुन्हेगार नव्या पद्धती वापरत आहेत. कमी वेळात जास्त नफा मिळवण्याच्या आमिषाला बळी पडून अनेकजण आपली बँकिंग माहिती, ओटीपी आणि वैयक्तिक तपशील शेअर करतात.

# श्री क्षेत्र भीमाशंकरचे दर्शन लांबणीवर, मंदिर पुन्हा इतके महिने बंद

पुणे । प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात दर्शनासाठी जाण्याचा प्लॅन करत असाल तर



तुमच्यासाठी एक मोठी अन् महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भीमाशंकर मंदिर आणखी ५३ दिवस बंद राहणार आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबतची माहिती दिली आहे. मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे आणि भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बारा ज्योतिर्लिंग पैकी एक असलेले भीमाशंकर मंदिरात सुरू असलेल्या सभामंडप व परिसर विकास कामांमुळे, तसेच कुंभमेळा पार्श्वभूमीवर वाढणारी गर्दी आणि सुरक्षिततेचा विचार करून ९ एप्रिल ते ३१ मे २०२६ दरम्यान मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यापूर्वीही मंदिर तीन महिन्यांपासून बंद होते, आणि आता पुन्हा पावणे दोन महिने बंद राहणार असून पावसाळ्यापूर्वी मंदिर खुले करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

दर बारा वर्षांनी होणारा कुंभमेळा नाशिक येथे भरणार आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथेही नियोजन सुरु झाले आहे. कुंभमेळ्याच्या काळात भीमाशंकर येथेही भाविक गर्दी करत असतात. या गर्दीचे नियोजन आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे काम सध्या सुरु आहे. भीमाशंकर येथे नवीन सभामंडप उभारण्याचे काम सुरु आहे. त्याचबरोबर पायरी मार्ग, मंदिरातील विविध विकासकामे वेगाने सुरु आहे. या सर्व कामांमुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री ठेवण्यात आली आहे. त्यामुळेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

# के. टी. बंधाऱ्यात बुडून १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

ओतूर : येथील के. टी. बंधाऱ्यात बुडून एका १५ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

देवप्रकाश कुमार (वय १५) असे मृत मुलाचे नाव असून, तो ओतूर परिसरातील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. सायंकाळच्या सुमारास के. टी. बंधाऱ्यात पोहण्यासाठी



गेल्यानंतर तो पाण्यात बुडाल्याची प्राथमिक माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने मुलाला बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद ओतूर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास ओतूर पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर धरणे, बंधारे व खोल पाण्याच्या ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांनी तसेच विशेषतः युवक व लहान मुलांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पुण्यातील या महामार्गावर गांजा तस्करांचा धुमाकूळ, पोलिसांना पांढऱ्या कारमध्ये सापडला २५ किलो गांजा

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील धायगुडेवाडी येथे यवत पोलिसांनी गांजा वाहतुकीवर मोठी कारवाई केली आहे.या कारवाईत एकूण २९ किलो ६०० ग्रॅम गांजा करण्यात आला आहे.एका चारचाकी बलेनो गाडीतून या गांजाची वाहतूक करण्यात येत होती. गोपनीय माहितीच्या आधारे यवत पोलिसांनी कारवाई करीत १४ लाख ५० हजार रुपये किमतीचा गांजा पोलिसांनी जप्त केला आहे.या प्रकरणी शाकीर शब्बीर पानसरे आणि समाधान शिवाजी दाभाडे या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून गुंगीकारक अंमलीपदार्थ गांजाचा माल सप्लाय होत असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती यवत पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी रात्रीच्या सुमारास पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर धायगुडेवाडी गावाच्या हद्दीत एका हॉटेलच्या समोर नाकाबंदी लावून कारवाई केली. या नाकाबंदी दरम्यान पांढऱ्या रंगाच्या बलेनो कारमधून हा गांजा वाहतूक होत असल्याचे छापे मारीत निदर्शनास आले. या छापेमारीत १४ लाख ५० हजार रुपये किमतीचा २९ किलो ६०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असेल पाच लाख पन्नास हजार रुपये किमतीचे



चार चाकी वाहन देखील जप्त करण्यात आले आहे.या प्रकरणी शाकीर शब्बीर पानसरे (मूळ रा. तालमीसमोर येवलेवाडी,ता.हवेली जि.पुणे) या विरोधात गुन्हा दाखल कण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

# वॉटरपार्कमध्ये भीषण अपघात, स्लाइडवरून पडल्याने सहलीसाठी गेलेल्या महिलेचे अर्धे शरीर कायमस्वरुपी निकामी

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मोराची चिंचोली (चेीरलहळ उहळपलहेश्रळ) येथे असलेल्या जय मल्हार कृषी पर्यटन केंद्रातील वॉटरपार्कमध्ये व्यवस्थापकांच्या निष्काळजीपणामुळे गंभीर दुर्घटना घडली आहे. सहलीसाठी आलेल्या एका महिलेचा वॉटर स्लाइडवर अपघात होऊन तिचे अर्धे शरीर कायमस्वरुपी निकामी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अश्विनी संदीप नप्ते (वय ३७) असं संबंधित महिलेचं नाव असून त्यांच्यवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

करंदी येथील अश्विनी संदीप नप्ते या आपल्या कुटुंबासह मोराची चिंचोली येथील वॉटरपार्कमध्ये सहलीसाठी गेल्या होत्या. वॉटर स्लाइडवरून घसरताना पाण्याची पातळी अत्यंत कमी असल्याने त्या जोरात खाली आपटल्या आणि जागीच बेशुद्ध पडल्या. घटनेनंतर तातडीची वैद्यकीय सुविधा किंवा रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे नातेवाईकांना त्यांना खासगी रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करावे लागले. तपासणीत त्यांच्या पाठीचे चार मणके तुटल्याचे समोर आले असून डॉक्टरांनी त्यांचे अर्धे शरीर कायमस्वरूपी निकामी झाल्याचं स्पष्ट केलं आहे. या प्रकरणी महिलेचे नातेवाईक किरण नप्ते यांच्या फिर्यादीवरून शिरुर पोलीस ठाण्यात वॉटरपार्कचे मालक आणि व्यवस्थापकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे वॉटरपार्कमधील सुरक्षेच्या उपाययोजनांवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पर्यटकांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत असून प्रशासनाने याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# कैलास सत्यार्थी यांना 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' जाहीर; पुण्यात रंगणार दिग्गजांचा गौरव सोहळा

पुणे

नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांना यंदाचा मानाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी ही घोषणा केली असून मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून हा सोहळा पार पडणार आहे.

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्ट्स तर्फे सकाळ माध्यम समूहाच्या सहकार्याने आयोजित केला जाणारा हा कार्यक्रम देशातील एक अत्यंत प्रतिष्ठित सांस्कृतिक उपक्रम मानला जातो. कला, साहित्य आणि समाजसेवा या क्षेत्रांत अष्टपैलू योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना सन्मानित करण्याची परंपरा या निमित्ताने यंदाही जपली जाणार आहे. या वर्षाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये विविध क्षेत्रांतील नामवंतांचा समावेश आहे. संगीत क्षेत्रातील योगदानासाठी महेश काळे आणि नृत्य क्षेत्रासाठी शमा भाटे यांना गौरवण्यात येणार आहे. रंगमंच आणि चित्रपट विभागातून



सुबोध भावे यांना, तर सिनेमा क्षेत्रासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी यांना हा सन्मान प्रदान केला जाईल. पत्रकारितेतील योगदानासाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले आणि विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर यांची निवड करण्यात आली आहे. समाजसेवेच्या गटात ठाण्यातील वसुंधरा संजीवनी मंडळाचे आनंद भागवत यांचा सत्कार होईल. तसेच 'मोहन वाघ पुरस्कार' यंदा जिगीषा अष्टविनायक निर्मित 'भूमिका' या नाटकाला देण्यात येणार असून, मुख्य अभिनेता सचिन खेडेकर यांच्यासह निर्माते दिलीप जाधव आणि श्रीपाद पद्माकर यांनाही सन्मानित केले जाईल.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराचे' हे पाचवे वर्ष आहे. कैलास सत्यार्थी यांनी मुलांच्या अधिकारांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या अतुलनीय कार्याचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून केला जाणार आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड हे या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विज्ञान, अध्यात्म आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा प्रसार करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्या उपस्थितीला विशेष महत्त्व आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी म्हणून पं. हृदयनाथ मंगेशकर स्वतः 'मी लता दीनानाथ' ही विशेष सांगीतिक मैफल सादर करणार आहेत. यामध्ये लता मंगेशकर यांच्या अजरामर गीतांचा प्रवास उलगडला जाईल. या मैफलीत विभावरी जोशी, मधुरा दातार, सावनी रविंद्र, श्रेयसी पावगी, मनीषा निश्चल, ऋतुजा तारे आणि डॉ. उन्मेष करमरकर हे कलाकार गायन सादर करतील. मिलिंद कुलकर्णी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतील, तर सुप्रिया चिटणीस सुत्रसंचालक म्हणून जबाबदारी सांभाळतील. हा भव्य सोहळा शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५:०० ते रात्री १०:०० या वेळेत गणेश कला क्रीडा मंदिर, स्वारगेट, पुणे येथे संपन्न होणार आहे.